# महानगरपालिका औरंगाबाद

## स्थायी समिती सभेचे  इतिवृत्तांत

दिनांक २४-११-२००९

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दि.२४/११/२००९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.१७) इतिवृत्त**

मंगळवार, दिनांक २४ नोव्हेंबर २००९ रोजी स्थायी समितीची सभा **मा.सभापती श्री.अब्दुल साजेद अब्दुल सत्तार** यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिका मुख्य कार्यालयातील 'मलिक अंबर स्थायी समिती सभागृह' येथे दुपारी ३.४० वाजता 'वंदे मातरम्' या गिताने सुरू झाली. या सभेस मा.आयुक्त श्री. पुरूषोत्तम भापकर, भा.प्र.से., नगर सचिव श्री.एम.ए.पठाण यांचेसह संबंधीत अधिकारी तसेच खालीलप्रमाणे सन्माननीय सभासद उपस्थित होते.

०१. श्री. कटकटे सतीश विश्वनाथ
०२. श्री. गवळी रविकांत काशीनाथ
०३. श्री. घडमोडे भगवान देवीदास
०४. श्री. पाथ्रीकर दत्ताभाऊ अण्णासाहेब
०५. श्री. सुरे सिताराम इसराम
०६. श्री. देसरडा प्रशांत सुभाष
०७. श्री. कुचे नारायण तिलोकचंद
०८. श्रीमती खान मेहरून्नीसा हमीद खान
०९. श्री. जावेद हसन खान
१०. श्री. पांडे विनायक प्रभाकर
११. श्री. सोनवणे कचरू श्रीपत
१२. श्री. निमगांवकर प्रल्हाद गणपतराव
१३. सौ. मोमीन सफिया फिरदौस
१४. श्री. शिंदे दामोधर माधवराव

**विषय क्र. १८५ :**

दिनांक ०३/११/२००९ (का.प.क्र.१५) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**ठराव :**

दिनांक ०३/११/२००९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १८६ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, वॉर्ड क्र.१२, जयभिमनगर, आसेफिया कॉलनी येथे पुनःर्डांबरीकरण करणे या कामाचे अंदाजपत्रक सा.बां. खात्याचे सन २००८-०९ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून अंदाजपत्रकीय रक्कम रू.१५,००,०००/- होत आहे. सदरील काम सन २००९-१० च्या अर्थसंकल्पात पुनःर्डांबरीकरण (Re-surfacing) करणे या

लेखाशिर्ष अंतर्गत प्रस्तावीत आहे. त्यास मा.आयुक्त यांनी दिनांक ६/११/२००९ रोजी मा.स्थायी समिती समोर मंजुरीस्तव सादर करण्यास मान्यता दिली आहे.

तरी रक्कम रू.१५,००,०००/- चे अंदाजपत्रक मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.१२, जयभिमनगर, आसेफिया कॉलनी येथे पुनःडांबरीकरण करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.१५,००,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १८७ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, वॉर्ड क्र.१३, विश्वासनगर, एन-१२ अंतर्गतच्या जुन्या रस्त्यावर विविध ठिकाणी पुनःडांबरीकरण करणे या कामाचे अंदाजपत्रक सा.बां. खात्याचे सन २००८-०९ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असुन अंदाजपत्रकीय रक्कम रू.१५,००,०००/- होत आहे. सदरील काम सन २००९-१० च्या अर्थसंकल्पात पुनःडांबरीकरण (Re-surfacing) करणे या लेखाशिर्ष अंतर्गत प्रस्तावीत आहे. त्यास मा.आयुक्त यांनी दिनांक ६/११/२००९ रोजी मा.स्थायी समिती समोर मंजुरीस्तव सादर करण्यास मान्यता दिली आहे.

तरी रक्कम रू.१५,००,०००/- चे अंदाजपत्रक मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.१३, विश्वासनगर, एन-१२ अंतर्गतच्या जुन्या रस्त्यावर विविध ठिकाणी पुनःडांबरीकरण करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.१५,००,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १८८ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, वॉर्ड क्र.३२ मो.कबाडीपुरा बुढीलेन येथील जुन्या रस्त्यावर पुनःडांबरीकरण करणे या कामाचे अंदाजपत्रक सा.बां.खात्याचे सन २००८-०९ च्या रासुचीनुसार तयार करण्यात आले असून अंदाजपत्रकीय रक्कम रू.१०,००,०००/- होत आहे. सदरील काम सन २००९-१० च्या अर्थसंकल्पातील पान क्र.SCR-A-१ अ.क्र.०६ नवीन डांबरी रस्ते शहर या लेखाशिर्ष अंतर्गत प्रस्तावित आहे. त्यास मा.आयुक्त महोदय यांनी दिनांक ७/११/२००९ रोजी मान्यता दिली आहे.

तरी रक्कम रू.१०,००,०००/- चे अंदाजपत्रक मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.३२ मो.कबाडीपुरा बुढीलेन येथील जुन्या रस्त्यावर पुनःडांबरीकरण करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.१०,००,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १८९ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.५९ अंतर्गत सिल्लेखाना चौक ते लक्ष्मण चावडी रस्त्यांच्या मध्ये दुभाजकाचे सौंदर्यीकरण करणे, ग्रील बसविणे व वॉटर सॅम्प बांधुन पाईपलाईन करणे या कामाचे अंदाजपत्रक सा.बां.खात्याचे सन २००८-०९ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असुन अंदाजपत्रकीय रक्कम रू.१४,९२,४००/- होत आहे. सदरील काम सन २००९-१० च्या अर्थसंकल्पात शहर सौंदर्यीकरण या लेखाशिर्ष अंतर्गत प्रस्तावित आहे. प्रस्तावित अंदाजपत्रकास मा.आयुक्त महोदय यांनी प्रशासकीय मंजुरी देवुन प्रस्ताव स्थायी समिती समोर ठेवण्यास शिफारस केलेली आहे.

तरी रक्कम रू.१४,९२,४००/- चे अंदाजपत्रकाचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.५९ अंतर्गत सिल्लेखाना चौक ते लक्ष्मण चावडी रस्त्यांच्या मध्ये दुभाजकाचे सौंदर्यीकरण करणे, ग्रील बसविणे व वॉटर सॅम्प बांधुन पाईपलाईन करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.१४,९२,४००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १९० :**

कार्यकारी अभियंता (वॉर्ड इ व फ), महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, वॉर्ड क्र.७२ अंतर्गत एन-३ एन-४ भागात विविध ठिकाणी रस्त्याचे पुनःर्डांबरीकरण करणेच्या कामासाठी सा.बां.खात्याचे सन २००८-०९ चे जिल्हा दरसुची नुसार रक्कम रू.१४,९९,५००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन त्यास मा.आयुक्तांनी दि.१६/११/२००९ अन्वये मंजुरी दिली आहे.

सबब सदर कामासाठी रक्कम रू.१४,९९,५००/- चे अंदाजपत्रक मंजुरीसाठी प्रस्ताव सादर. सदर कामाचा खर्च GBR-E-१ अ.क्र.८ रक्कम रू.३.०० कोटी मधुन वळती केलेल्या तरतुदी मधुन पुनःर्डांबरीकरण शहरी भाग (मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.७३२ दि.७/११/०९) मधुन करण्यात येईल. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.७२ अंतर्गत एन-३ एन-४ भागात विविध ठिकाणी रस्त्याचे पुनःर्डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.१४,९९,५००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १९१ :**

अतिरिक्त शहर अभियंता विभागाकडून प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.०६ येथे विविध ठिकाणी डांबरीकरण करणे या कामाचे अंदाजपत्रक सा.बा. विभाग दरसुची सन २००८-०९ नुसार तयार करण्यात आले असून अं.प.रक्कम रू.१६,९९,८७०/- आहे. सदरील काम सन २००९-१० च्या अर्थसंकल्पात नवीन डांबरी रस्ते या लेखाशिर्ष अंतर्गत प्रस्तावित आहे. मा.स्थायी समिती सभा विषय क्र.१४५ दिनांक ३/११/२००९ अन्वये अंदाजपत्रकास मान्यता प्राप्त झाल्यानंतर सदर कामाच्या निविदा जा.क्र.मनपा/अशअ/४०४/२००९, दिनांक ६/११/२००९ पत्राद्वारे ई-टेंडरींग विभागामार्फत मागविण्यात आल्या असता ई-टेंडरींग विभागाने दिलेल्या अहवालानुसार एकुण ०६ निविदा विक्री झाल्या व स्विकृतीच्या अंतिम तारखेस दिनांक १९/११/२००९ रोजी एकुण ०५ निविदा दर भरून प्राप्त झाल्या आहेत. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. एम. ए. सिद्यीकी | ३१.९३% कमी |
| २. | मे.आर.के.कन्स्ट्रक्शन | २६.९९% कमी |
| ३. | श्री. के.बी. पाथ्रीकर | २१.६% कमी |
| ४. | मे.मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन | ६.८१% कमी |
| ५. | मे.आदिनाथ कन्स्ट्रक्शन | ३.५% कमी |

वरील प्रमाणे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३१.९३% कमी आणि तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची निविदा श्री.एम.ए.सिद्यीकी यांची आहे. त्यास दिनांक २०/११/२००९ रोजी मा.आयुक्त यांची

मंजुरी झाली आहे. श्री.एम.ए.सिद्यीकी, यांची ३१.९३% कमी दराची निविदा मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री.प्रशांत देसरडा : विषय क्रमांक 191,192 तसेच स्थायी समितीत आलेले ठराव व भविष्यात येणारे डांबरीकरणाचे ठराव हे 25 ते 35 टक्के कमी दराने आलेले आहे. 191चा विषयात 31.93 कमी दाराने व 192चा विषयात 30.01 टक्के कमी दराने काम करीत आहे. कमी दराने आल्यामुळे महानगरपालिकेस बचत झालेली आहे. परंतु बचतीकडे बघीतल्यास कामाची गुणवत्तेचा प्रश्न निर्माण होत आहे. डांबरीकरणाचे आजचे भाव बघीतल्यास स्केअर मिटरचे रेट बघीतल्यास जेवढा डांबराला पैसा लागतो तेवढया पैशात 35 टक्के बिलोमधे कंत्राटदार काम करीत आहे. त्यास लागणारी खडी, मशनरी, मॅनपावर इत्यादी कंत्राटदार महानगरपालिकेस मोफत देत आहे. याबाबतीत विचारणा केल्यास तुम्ही चांगली सेवा देतात, रॅम्केकडुन साफसफाई केली जाते,एकदिवसाआड पाणी सोडण्यात येते. तरीपण महानगरपालिकेस फ्रिमधे रस्ते तयार करून देतो असे कंत्राटदाराचे म्हणने आहे. चौकशी केल्यास डांबरामधे खरे डांबरमिळविले जातो का हा संशोधनाचा विषय आहे. मध्यंतरी थर्ड पार्टी इन्स्पेक्शन चा विषय केला. महानगरपालिकेतील जे.ई.कडे असणारा लोड पहाता पुण्याची एजन्सी नेमण्यात आली. उड्डाणपुल ते टि.व्हि.सेंटरपर्यंतचे रोडचे काम चालू आहे. उड्डाणपुल ते जकात नाका रोडचे काम चालू आहे ज्याने टेंडर करून दिले त्या व्यक्तीला टेंडरच्या कॉस्ट 3 टक्के रक्कम देण्यात आली. पुण्याच्या एजन्सीकडुन इस्टिमेट तयार करून घेतले. एमजीएमचा येथील जो रोड आहे हॉटेल सहारा समोरचा जो नाला आहे त्यात एमजीएम, जेएनईसी चे पाणी त्या नाल्यात येते. 30-40 एक जागा त्याचे पाणी नाल्यात येते. रोडचे इस्टीमेट तयार करतांना कुठेच नाल्याचे, साईडड्रेनचे डिजाईन दिसणार नाही. आझाद चौकात पावसाळयात नागरीकांच्या घरात कमरेएवढे पाणी साठलेले आढळुन आले. साईडड्रेन कुठेही दिसणार नाही. करोडो रूपयांचे रस्ते तयार करत आहे परंतु लाखो रूपयांचे साइडड्रेन दिसणार नाही. 35 टक्के बीलोचे जे कामे आहेत ते डांबराचे रेट परवडु शकणारे नाही. खडी, मशीनरी आणि मॅनपॉवर कंत्राटदार फ्रि मधे देत आहे. कामास हरकत नाही काम मंजूर केले पाहिजे परंतु 35 टक्के बीलो काम कसे परवडु शकते याचा खुलासा प्रशासनाने करावा. सर्व कंत्राटदारांची 25 ते 35 टक्के बीलोचे कामे घेतात त्यांची 15 टक्के सेव्हिंग रक्कम महानगरपालिकेने आपल्याकडे ठेवली पाहिजे या 15 टक्के रक्कमेमुळे कंत्राटदार रस्त्यांच्या गुणवत्तेमधे सुधारणा करण्याचा प्रयत्न करतील. अंदाजपत्रकात किती टक्के बीलो कामे झालेत या बाबतीत अभ्यास करण्याची प्रशासनाची गरज आहे. जेईकडे कामाचा व्याप पहाता ते किती लक्ष देवु शकेल याची मला शंका आहे. एमजीएमच्या अपघात विभागाच्या समोरील रोड बघीतलातर घसरगुंडी सारखा स्लोप आहे. रस्त्यांची गुणवत्ता तपासुन बीले देण्यात यावी 10% अमाऊन्ट ठेवा.

श्री.रविकांत गवळी : शहरातील प्रत्येक भागात रस्त्यांची दुरावस्था झालेली आहे. लोकसभा विधानसभेच्या आचारसंहितेमधे कालावधी निघुन गेला व आता पुन्हा दोन महिण्यांनंतर आचारसंहिता लागणार आहे. सन 2008-09चा डिएसआर बघीतलातर 36,000/- रूपये टनाने डांबराचा भाव चालू आहे. मार्केटमधे 38,000 ते 40,000 रूपये टनाने डांबराचा भाव चालु आहे. असे असतांना 35 टक्के बीलो कंत्राटदार काम घेतो रस्त्याची गुणवत्ता दर्जा कसा असायला पाहिजे हा संशोधनाचा विषय आहे. डांबरीकरणाचे केलेले काम दोन ते तीन महिण्यांनंतर उखडुन जाते. मा.आयुक्तांनी काही महिण्यांपुर्वी तातडीने पॅचवर्क करण्याचे आदेश दिले होते परंतु ते पॅचवर्क आठ दिवसांमधे उखडुन गेले असे का होते. आपल्याकडे इंडियन रोड कॉंग्रेसची एक समिती आहे त्याच्यात काही नॉर्मस् आहेत का? नॉर्मस् प्रमाणे ते फॉलो करतो का? हे सुध्दा बघणे गरजेचे आहे. वारंवार त्याच एजन्सी काम वाटुन घेतात. 35 टक्के बीलोप्रमाणे महानगरपालिकेचे पैसे वाचतोय हे चुकीचे आहे कारण रस्त्यांची गुणवत्ता टिकली जात नाही. तीन वर्षतरी रस्त्याची दुरावस्था होता कामा नये परंतु सहा महिण्यांतच रस्त्याची दुरावस्था होते. 30 टक्के बीलोचे काम घेतलेले गुत्तेदार वर्क ऑर्डरहोवुन सुध्दा काम करण्यास तयार होत नाही. 2% अनामत रक्कम भरत नाही. कधी नाईलाजाने भरतो. कार्यादेशही नेतो, 2-3 वर्ष काम करीत नाही. अंदाजपत्रक बनवतांना शाखा अभियंता चुकीचे अंदाजपत्रक तयार करतो काय?

श्री.विनायक पांडे : स्थायी समितीसमोर आलेल्या डांबरीकरणावर स.सदस्यांनी चर्चा केली. मी स्वतः कंत्राटदार राहीलो आहे. मी संबधीत कंत्राटदारास विचारणा केली की 30 ते 35 टक्के बीलो काम कसे परवडते तर त्याचे म्हणने आहे की, आज माझी मशनरीसाठी काम पाहिजे माझी लिंक तुटू नये. येत्या काही महीण्यांमधे आचारसंहिता लागणार आहे प्रत्येक नगरसेवकास कामाची घाई झालेली आहे स्वतःविकासकामाची संचिका घेऊन फिरत आहे. माझा वार्डात बीबी का मकबरा,भगवान बुध्दांची लेणी इत्यादी पर्यटन स्थळे येतात त्या ठिकाणाहुन पर्यटक तसेच स्थानिक नागरीक जात असतात परंतु रस्त्याची बिकट अवस्था झालेली आहे. 30 टक्के बीलो काम जात असेल तर काहीना काही रक्कम डिपॉजिट ठेवावी लागेल. ज्या अटी शर्ती घालुन देतो एजन्सीस त्या सर्व एजन्सीची एक बैठक बोलावुन रस्त्यांची गुणवत्ता राखत असेलतरच हे कामे करा म्हणुन सांगण्यात यावे. याबाबतीत विचार करून सदरील विषय मंजूर करण्यात यावा.

श्री.प्रशांत देसरडा : अमरप्रित हॉटेलची परवानगी उधारीवर दिली. पर्यटनास वाव मिळावा म्हणून उधारीत परवानगी दिली असे पत्र आले.

श्री.सिताराम सुरे : 25 कोटीचे रस्ते हे डिफर पेमेंटवर केलेले आहे आणि 25 कोटीचे आयआरडीपी मार्फेत महानगरपालिकेने रस्ते केलेले आहे त्यातील वार्ड क्रमांक दोनचा एक रस्ता आहे त्यावर दिड कोटी रूपये खर्च केलेले आहे यास साईडड्रेन, गटारचे पाणी कुठे मिळणार आहे. या बाबतीत विचार केलेला नाही संबधीत एजन्सीला तीन लाख रूपये दिले ते कुठल्या बेसीसवर

देण्यात आले. 50 कोटीचे जे कामे झालेले आहे त्यावर चौकशी समिती नेमण्यात यावी.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : जे 35 टक्के बीलो कामे आलेली आहे त्याबाबतीत जी चर्चा चालु आहे तर आपण Nonqulified लोक आहेत. जे ईस्टिमेट तयार केलेले आहे ते Qulified लोकांनी केलेले आहे. माझी अशी विनंती आहे की, ज्या ज्या विभागाचे जे विभागप्रमुख आहे. ते काय कामे करतात. गेल्या सहा महिण्यांपासुन माझी एक संचिका गार्डनमधे योगा सेंटर उभे करण्यासाठी बजेट प्रोव्हीजन झाले आहे त्यास टिपी ची परवानगी कशासाठी लागते. यासाठी जर टिपीची परवानगी लागत असेलतर शहरातील सर्वच गार्डनला तशी परवानगी लागायला पाहिजे. एका संचिकेसाठी किती दिवस लागतात आणि जे एचओडी आहे त्यांनी संचिका फारवर्ड करून दिली म्हणजे त्यांना पगार मिळतो काय? डांबरीकरणाचे काम बीलोमधे कशापध्दतीने होते तसेच आजपर्यंत झालेले कामे कशापध्दतीने झाले याबाबतीत संबधीत अधिकारी यांनी खुलासा करावा. वर्षभराचे कर निश्चित करा व त्यांना द्या.

श्री.भगवान घडमोडे : 30 टक्के बीलो काम घेवुन रस्त्याची गुणवत्तेकडे लक्ष असणे नियंत्रण असणे गरजेचे आहे. ज्या अटी शर्ती लादल्या जातात त्याची पुर्तता झाली पाहिजे. स.स.श्री.विनायक पांडे यांनी सांगीतल्याप्रमाणे की, कंत्राटदार यांच्या मशनरी उभ्या असुन त्यांना काम मिळण्यासाठी बीलो पध्दतीने काम घेतले आहे. पुर्वी 38 टक्क्यांनी कमी दराची कामे झालेली आहे. या दोन्हीं बाबींचा विचार करणे गरजे आहे. स्पर्धा करण्यास हरकत नाही परंतु रस्त्यांची गुणवत्ता राखली जावी.

मा.सभापती : डांबरीकरणाबाबत जे प्रश्न स.सदस्यांनी उपस्थित केलेले आहे त्याबाबतीत शहर अभियंता यांनी खुलासा करावा.

शहर अभियंता : डांबरीकरणात दोन विषय आहेत एक आयआरडीपी आणि डिफर पेमेंटचे कामे आणि इतर कामे आयआरडीपी आणि डिफर पेमेंटचे कामे हे बीलो टेंडर नाहीत आणि जे छोटे कामे निघतात 25 लाखाची ती सर्वसाधारणपणे 15 ते 35 टक्क्यांपर्यंत बीलो येतात. सर्वसाधारण हि कामे 25 टक्के बीलो येतात. पाच ते सहा ठेकेदारांचे प्लांट औरंगाबादमधे आहेत आणि हेच ठेकेदार पीडब्ल्युडीमध्येही कामे करतात आणि याच्या व्यतिरीक्त दुसरे कुठलेही कंत्राटदार इथे येत नाही याचाही अर्थ असा आहे. त्यांच्यातल्या त्यांच्यात स्पर्धा होते आणि ते कामे करुन घेतात. यात रिंग होत नाही रिंग झाली असती तर 5 टक्के above आली असती. ई टेंडरींग मधे संधी नाही आणि हि कामे निकोप पध्दतीनेच झालेली आहे. गुणवत्ता तपासणीसाठी आयआरडीपी आणि डिफर पेमेंटसाठी पीएमसी नेमली होती त्यांच्याकडुन आणि शासनाच्या आत्ता आलेल्या जीआरनुसार जी काही कामे 50 लाखाच्या वर आहे त्याचे टेक्निकल तपासणी थर्डपार्टी नावाचे ऑडिट आहे त्या थर्डपार्टी ऑडिट म्हणुन तपासुन घेवु या.

श्री.प्रशांत देसरडा : रस्त्यांचे कामे झाले आहेत त्याची पहाणी केली आहे का? त्यातील एवढे रस्त्यांची गुणवत्ता चांगली वाटली एवढया रस्त्यांची गुणवत्ता चांगली नाही

याबाबतची तपासणी आपण केली आहे का? टेक्निकली 25 ते 30 टक्के बीलोमधे काम करू शकतो म्हणुन प्रशासनास वाटते का आणि सध्या डांबराचे मार्केटमध्ये असलेले रेट.

शहर अभियंता : पीडब्ल्युडीने त्यांचे पध्दतीने केलेले डिएसआर तोच जश्यास तसा लागु केला जातो. महानगरपालिका पाच टक्के ॲड केला जातो. ठेकेदारास बीलोच्या बाबतीत विचारणा केली की हे परवडते कसे याबाबतीत प्रशासनाने लेखी म्हणने घेतलेले आहे. त्यांच्याकडील लेबर,मशनरी बसुन राहु नये. काही प्रमाणात ते असु शकते परंतु माझे वैयक्तिक मत म्हणजे 25 टक्केच्या पुढे 15 टक्केच्या पुढे कमी दर त्यांना परवडु शकत नाही.

श्री.रविकांत गवळी : आपल्या कार्यकाळात एकतरी रोड तयार झाला असेल त्याची आजची स्थिती काय आहे.

शहर अभियंता : सदरची कामे समाधानकारक वाटतात.

श्री.रविकांत गवळी : डांबर, खडी किती असायला पाहिजे इंडियन रोड कॉग्रेस समितीच्या नॉर्मस् प्रमाणे कामे होतात का? माझ्या वार्डात दिड वर्षापुर्वी एक रोड तयार केला त्याची आजरोजी बिकट अवस्था झाली आहे. माहिती घेतली असता तीन वर्षतरी त्या ठिकाणी रोड करता येत नाही. शाखा अभियंता अंदाजपत्रक तयार करतो बीलोचे अंदाजपत्रक तयार करून महानगरपालिकेचे नुकसान का करण्यात येते.

शहर अभियंता : तपासणी करावी लागेल. गव्हेनमेंटच्या नॉर्मस्ची जबाबदारी संबधीत डेप्टी इंजिनिअर, शाखा अभियंता आणि एक्झीक्युटिव्ह इंजिनिअर यांचे काम आहे.

श्री.रविकांत गवळी : उपअभियंता,शाखा अभियंता यांनी काम केले नाहीतर त्यांच्यावर नियंत्रण,देखरेख ठेवणारा कोण.

शहर अभियंता : तक्रार आली तर तपासणी करण्याचे काम माझे आहे. मी जे कामे पाहिलीत ती मला समाधानकारक वाटली.

श्री.प्रशांत देसरडा : पीएमसीच्या इस्टिमेट प्रमाणे सर्व रोडचे कामे झालेली आहेत.

शहर अभियंता : तपासणी केली नाही, तपासणी करण्यासाठी पीएमसीची नेमणुक केली आहे.

श्री.प्रशांत देसरडा : सभागृहात दिशाभुल केली जात आहे. सात कोटींची कामे आहे पीएमसीला 3 टक्केप्रमाणे पेमेंट केलेले आहे.

मा.सभापती : बील देण्यापुर्वी संचिकेवर शहर अभियंता हे तपासुन स्वाक्षरी करीत असेल.

शहर अभियंता : जसे मा.आयुक्त सही करतात हे बील पास करणे योग्य आहे अशी सही आहे.

मा.सभापती : काम बघण्याची गरज नाही का?

श्री.भगवान घडमोडे : खालच्या एखादया कर्मचारी यांनी चांगले काम केल्यास त्याचे कौतुक होवुन मा.आयुक्त म्हणतात आम्ही चांगले काम करतो. एखादयाने चुक केल्यास मा.आयुक्त म्हणतील माझी काही चुक नाही माझ्या कर्मचाऱ्याची चुक आहे. हि जबाबदारी झटकने योग्य नाही. हि जबाबदारी सर्वांची आहे. पीएमसी नेमतांनाही म्हटले होते की, आमच्या अधिकाऱ्यांवर विश्वास नाही काय? थर्ड पार्टी इन्सपेक्शन झाले पाहिजे.

मा.सभापती : एम.बी. तपासल्याशिवाय पेमेंट कसे करता.

श्री.सिताराम सुरे : रस्त्यांच्या कामाची पहाणी करण्यासाठी वार्ड क्रमांक 2 मधे पहाणी करण्यात यावी. रस्त्याची साईडड्रेन चुकीच्या पध्दतीने बांधलेली आहे. गटारी साफ करयला चान्स नाही रॅम्केचे म्हणने आहे की, माझ्याकडे त्या गटारी नाही.

श्री.रविकांत गवळी : प्रत्येक बैठकीत विषयावर दोन तास चर्चा होती परंतु प्रशासन गांर्भितेने घेत नाही. सन 2005 पासुन आत्तापर्यंत कोणत्या भागातील किती रस्ते केलेत. त्याच्यावर किती खर्च झाला किती किलोमीटरपर्यंतचे रस्ते तयार झालेत. तीन वर्षांपर्यंत सदरील रस्ते व्यवस्थित असणे गरजेचे होते. तीन वर्षामधे चारवेळेस त्याच रस्त्याचे अंदाजपत्रक बनविलेले आहे. काही रस्ते सुस्थितीत असतांना पुन्हा नव्याने रस्ते तयार केलेले आहे आणि जे रस्ते तयार करण्याची गरज आहे ते तसेच राहिलेले आहे. आचारसंहितेचा विचार करता तसेच वार्डातही कामे झाली पाहिजेत म्हणुन गुणवत्तेसंदर्भात गुत्तेदाराकडुन बॉन्ड पेपर लिहुन घ्यावा. यासर्वांवर नियंत्रणासाठी मा.आयुक्तांनी कोणत्यातरी अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात यावी.

श्रीमती सफिया मोमिन : रेल्वेस्टेशन येथील उड्डाणपुल व रेल्वे ब्रिज येथील रोडचे इस्टीमेट वार्ड एफने तयार केले पाहिजे होते वार्ड ड ने तयार केले वार्ड ड कार्यालयास काम सांगीतले असता काम आमचे नाही म्हणुन सांगण्यात येते मग वार्ड फ चे काम का केले.

कार्य.अभियंता (अ/ड ) : वार्ड ड च्या अंतर्गत उड्डाणपुलाच्या खालील जेवढा रस्ता येतो तेवढयाच लांबीचे इस्टीमेट तयार केलेले आहे. मंजूर झाले आहे निवीदला जाणार आहे.

श्रीमती मेहरुन्निसा खान : आयआरडीपीचे जेवढे रस्ते मंजूर केले होते तेवढे रस्ते तयार झाले आहे का?

श्री.रविकांत गवळी : पैठणगेट येथील कामास 7 महिनेही झाले नाही. खड्डे वर दिसतात. शहर अभियंता समाधानी आहेत.

शहर अभियंता : सविस्तर तपासणी करावी लागेल, मग सांगता येईल.

श्री.सिताराम सुरे : आयआरडीपी आणि डिफर पेमेंटचे तीन वर्ष देखभाल दुरूस्ती त्यांच्याकडे होती. किती पेमेंट केले किती बाकी आहेत.

मा.सभापती : डिफर्ड पेमेंटचे रस्ते आणि आयआरडीपीचे किती रस्ते तयार झालेत तसेच किती पेमेंट दिले व बाकी किती आहे. काम ज्या पध्दतीने व्हायला पाहिजे त्यापध्दतीने झाले का खुलासा करण्यात यावा.

कार्य.अभियंता(अ, ड) : डिफर्ड पेमेंटचे एकुण 25 कोटीचे अंदाजपत्रक तयार केले होते शहरातील विवीध भागातील सहा रस्ते घेण्यात आले होते. अंदाजे 12 ते 15 किलोमीटर लांबीचे रस्ते होते. सहापैकी पाच रस्ते हाती घेतले होते एका रस्त्याचे काम सुरू केलेले नाही.

श्रीमती मेहरून्निसा खान : कुठल्या कुठल्या भागातील रस्ते आहे खुलासा करण्यात यावा.

कार्य.अभियंता(ड) : डिफर्ड पेमेंटचे सहा रस्ते आहेत त्यातील एका रस्त्याचे काम हाती घेतेलेले नाही. चार रस्त्याचे काम झालेले आहे व एक रस्ता प्रगती पथावर आहे.

1) वेदांत हॉटेल ते पीर बाजार
2) कटकटगेट ते पोलीस मेस
3) गजानन महाराज मंदिर ते एन-2
4) टिव्ही सेंटर ते सेव्हन हिल
5) जटवाडा रोड

तीन वर्षापर्यंत रस्त्यांची दुरूस्ती करण्याची जबाबदारी संबधीत गुत्तेदाराची आहे दुरूस्तीचा निधी राखुन ठेवलेला आहे. तीन वर्षापर्यंत त्यांचेकडुन काम करून घेणार आहोत.

मा.सभापती : आयआरडीपी रस्त्यांच्या बाबतीत खुलासा करण्यात यावा.

कार्य.अभियंता(अ, ड) : आयआरडीपी रस्ते जवळ जवळ पुर्ण झालेले आहेत.

श्री.सिताराम सुरे : वार्ड नंबर दोनचा एक कोटी पासष्ट लाखाचा जो रोड होणार होता तो अर्धवट अवस्थेत आहे. त्याचे पेमेंट किती केलेले आहे.

कार्य.अभियंता(अ, ड) : स.सदस्यांच्या वार्डात जो रस्ता केलेले आहे तो रस्ता as per specification ने केलेले आहे ज्या प्रमाणे आयआरसीचे नॉर्मस् होते त्या प्रमाणे रस्ता तयार केलेला आहे. स.सदस्यांच्या म्हणण्यानुसार पाण्याचा प्रवाह वाहुन जाण्यासाठी व्यवस्था झाली नाही. याचे कारण म्हणजे दोनशे ते तीनशे मीटर रस्ता खाजगी जमीनीतून जात होता. ज्या प्रमाणे अलाइनमेंट आहे त्याप्रमाणे रस्ता करू नये अलाइनमेंट चेंज करावा असा स.सदस्यांचा आग्रह होता. माझ्या अधिकारात सदरचा प्रश्न नसल्यामुळे रस्ता अर्धवट अवस्थेत राहिला आहे आणि पाण्याची विल्हेवाट लावण्याचे राहिले आहे.

मा.सभापती : आयआरडिपी बाबत खुलासा करण्यात यावा.

कार्य.अभियंता(अ,ड) : आरआरडिपीच्या बाबत रेल्वेस्टेशन उड्डाणपुल ते तरूण भारत, निर्लेपपासुन ते बीड बायपास लिंक रोड, सेव्हन हिल पासुन ते चंपा चौक सुत गिरणी, सुत गिरणी ते शिवाजी नगर, सिल्लेखाना येथील रस्ता एवढे रस्ते आयआरडिपीमधे घेतले होते.

श्रीमती मेहरुन्निसा खान : सुत गिरणी येथील रस्त्याचे खडीकरणाची कामे झालेले नाही.

मा.सभापती : मा.आयुक्तांना सोबत घेऊन सर्व स्थायी समितीचे सदस्य रस्त्यांची पहाणी करू.

श्री.प्रशांत देसरडा : घसरगुंडी एवढा स्लोप एमजीएम समोरील रस्ता तयार केलेला आहे.

मा.सभापती : स.सदस्यांच्या वतीने रस्त्यांच्या निवीदा 30 ते 35 टक्के बीलोबाबतीत कामाच्या गुणवत्तेबाबतीत प्रस्तावात स.सदस्यांनी सुचविलेले एक ते आठ मुद्दे ठेवलेले आहे. सदर प्रस्तावाला स्थायी समिती सर्वानुमते मंजूरी देत आहे. आयआरडीपीचे आणि डिफर पेमेंटचे रस्ते आहेत त्या सर्व रस्त्यांचे 15 टक्के रक्कम बिलाची अदा करण्यात येवु नये. या प्रकरणी स्थायी समिती एक समिती गठीत करीत आहे स.सदस्य श्री.रविकांत गवळी, श्री.प्रशांत देसरडा श्री.विनायक पांडे, श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर,श्री.जावेद हसन खान तसेच मा.आयुक्त, शहर अभियंता यांना सोबत घेवुन सर्व रस्त्यांची पहाणी केल्यानंतर अहवाल येईपर्यंत 15 टक्के रक्कम रोखुन पेमेंट करण्यात यावे. विषय क्रमांक 192-193 निवीदा दाखल झालेले आहे संबधीत गुत्तेदारांचे

15 टक्के रक्कम राखुन ठेवण्यात यावी. सदरील विषय मंजूर करण्यात येतात.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.०६ येथे विविध ठिकाणी डांबरीकरण करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३१.९३% कमी दराची श्री. एम. ए. सिद्यीकी यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. तसेच सभागृहात झालेल्या चर्चेनुसार कामाचे गुणवत्ता पडताळणीसाठी देयकाची १५% रक्कम एक वर्षासाठी थांबविण्यात यावी असे सर्वानुमते ठरले.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १९२ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, वॉर्ड क्र.९४ विविध ठिकाणी पुनःर्डांबरीकरण करणेच्या (विशाल मेगा मार्केट ते रेल्वे स्टेशन मुख्य रस्त्या पर्यंतच्या रस्त्याचे पुनःर्डांबरीकरण करणे) कामाचे सा.बां. विभागाच्या सन २००८-०९ च्या दरसुची नुसार रक्कम रूपये १४,९९,०८०/- चे अंदाजपत्रक असुन सदरील कामाचा खर्च नविन डांबरी रस्ते शहरी भाग या लेखा शिर्षकामधुन प्रस्तावित आहे. सदर कामासाठी निविदापत्रके मागविली असता, एकुण सात निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदा उघडण्यात आल्या असता, त्यात खालील प्रमाणे दर भरून प्राप्त झाले.

| | | |
|---|---|---|
| १. | मे.मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन कंपनी | ३०.०१% कमी |
| २. | श्री.राजेंद्रसिंग अजितसिंग | २९.९९% कमी |
| ३. | श्री. एम. ए. सिद्यीकी | २७.८६% कमी |
| ४. | मे.आदिनाथ कन्स्ट्रक्शन | २७.१% कमी |
| ५. | मे.ए.एस. कन्स्ट्रक्शन | २६.६६% कमी |
| ६. | मे.आर.के. कन्स्ट्रक्शन | २६.१% कमी |
| ७. | मे.अरोरा कन्स्ट्रक्शन | २२.८८% कमी |

वरील प्रमाणे प्राप्त निविदा पैकी तुलनात्मकदृष्ट्या म्हणजे सर्वात कमी दराची व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३०.०१% कमी दराची मे. मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन कंपनी यांची निविदा प्राप्त आहे.

तरी सदरील कामासाठी मे. मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन कंपनी यांचे दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३०.०१% कमी दराचा निविदेचा प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.९४ विविध ठिकाणी पुनःर्डांबरीकरण करणेच्या (विशाल मेगा मार्केट ते रेल्वे स्टेशन मुख्य रस्त्या पर्यंतच्या रस्त्याचे पुनःर्डांबरीकरण करणे) कामासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३०.०१% कमी दराची मे.मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन कंपनी यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. तसेच सभागृहात झालेल्या चर्चेनुसार कामाचे गुणवत्ता पडताळणीसाठी देयकाची १५% रक्कम एक वर्षासाठी थांबविण्यात यावी असे सर्वानुमते ठरले. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १९३ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सार केला आहे की, डॉ.सलीम अली सरोवराचे सौंदर्यीकरण व विकसीत करणे बाबतच्या विकास कामात येणार बाभळीचे झाडे तोडण्यात आली असुन सदर झाडांची विल्हेवाट लावण्याच्या दृष्टीने तोडलेल्या झाडांचा लिलाव करणे गरजेचे

असल्याने मुख्य लेखा परिक्षक, अतिरिक्त शहर अभियंता आणि बी.ओ.टी. कक्ष प्रमुख, महानगरपालिका यांची समिती स्थापन करण्यात आली होती.

दिनांक २७.१०.२००९ रोजीच्या वर्तमान पत्रात बाभळीची तोडलेली झाडे जाहीर लिलावाद्वारे विक्री करणे बाबतची जाहीर लिलाव सूचना प्रसिध्द करण्यात आली होती. त्या अनुषंगाने दिनांक ११.११.२००९ रोजी श्री.महेमुद खान आणि श्री.सिराज खान नवाब खान हे दोन बोली धारक बोली बोलणेसाठी उपस्थित होते. तथापी श्री.सिराज खान नवाब खान यांनी अनामत रक्कमेचा भरणा केला नाही. आणि श्री.महेमुद खान यांनी बाभळीच्या लाकडांची किंमत प्रति किलो रूपये १.५० (अक्षरी रूपये एक आणि पन्नास पैसे फक्त) एवढी बोली बोलली आहे. बाजार भावा प्रमाणे ओल्या लाकडाचे दर संयुक्तीक असल्याने आणि मा.आयुक्त यांनी त्यास मान्यता दिली आहे.

करीता डॉ.सलीम अली सरोवराचे सौंदर्यीकरण व विकसीत करणे बाबतच्या विकास कामात येणाऱ्या तोडलेल्या बाभळीची झाडे रू.१.५० (अक्षरी रूपये एक आणि पन्नास पैसे फक्त) प्रति किलो प्रमाणे श्री.महेमुद खान यांना देणे करीता प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

| | |
|---|---|
| मा.सभापती | : विषय क्रमांक 193 बाबतीत खुलासा करण्यात यावा. |
| बीओटी कक्ष प्रमुख | : डॉ.सलीम अली सरोवराचे सौदर्यीकरण व विकसीत करणे बाबतच्या कामात येणारे बाभळीचे झाले तोडण्यात अली आहे. सदरचे तोडलेले लाकड महानगरपालिकेच्या ताब्यात आहे त्याचा लिलाव करीत आहे. |
| विषय क्रमांक 193 | : मंजूर करण्यात येतो. |

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे डॉ.सलीम अली सरोवराचे सौंदर्यीकरण व विकसीत करणे बाबतच्या विकास कामात येणार बाभळीचे झाडे तोडण्यात आली असुन सदर झाडांची विल्हेवाट लावण्याच्या दृष्टीने तोडलेल्या झाडांच्या करण्यात आलेल्या लिलावानुसार डॉ.सलीम अली सरोवराचे सौंदर्यीकरण व विकसीत करणे बाबतच्या विकास कामात येणाऱ्या तोडलेल्या बाभळीची झाडे रू.१.५० (अक्षरी रूपये एक आणि पन्नास पैसे फक्त) प्रति किलो प्रमाणे श्री.महेमुद खान यांना देणे करीता सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १९४ :**

कार्यकारी अभियंता (वॉर्ड ब व क तथा विशेष प्रकल्प) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद महानगरपालिका हद्दीत डॉ.सलीम अली सरोवर परिसरात ५ द.ल.लि. क्षमतेचा सिवेज ट्रिटमेंट प्लॉन्ट (STP) राज्य शासनाने जाहीर केलेल्या "मराठवाडा विकास कार्यक्रम २००७" मधील सिवेज ट्रिटमेंट व्यवस्थापन या लेखाशिर्षांतर्गत प्राप्त अनुदानातून उभारावयाचा आहे.

सदरच्या मराठवाडा विकास कार्यक्रम २००७ मधुन महानगरपालिकेला अनुदानाचा पहिला हप्ता रूपये ३.१३ कोटी प्राप्त झाला असून, उर्वरीत अनुदानाची रक्कम रूपये ३.१२ कोटी येणाऱ्या पुढील आर्थिक वर्षात प्राप्त होणार आहे.

राज्य शासनाने सदर कार्यक्रमात शासन अनुदान २५% शासनाचा सहभाग (रूपये ६.२५ कोटी) व महानगरपालिकेच्या हिस्सा ७५% (रूपये १८.७५ कोटी) या प्रमाणात मंजुर करण्यात आलेले आहे. तथापी औरंगाबाद महानगरपालिकेची सद्य आर्थिक स्थिती योग्य नसल्याचे विचारात घेता औरंगाबाद महानगरपालिकेला उक्त नमूद प्रमाणे अनुदानाचा हिस्सा प्राप्त करणेसाठी रूपये २५.०० कोटीचा प्रकल्प राबविणे व शासन निर्देशानुसार त्यामध्ये महानगरपालिकेचा हिस्सा म्हणुन

७५% रक्कम रूपये १८.७५ कोटीचा भार उचलणे शक्य नाही. त्यास्तव राज्य शासनास त्यांनी टाकलेली २५% रक्कमेची अट वगळून किमान डॉ.सलीम अली सरोवर परिसरात (STP) प्रकल्पासाठी लागणारा संपूर्ण खर्च १००% या कार्यक्रमांतर्गत अनुदान स्वरूपात गृहित धरणे बाबत मंजुर मिळणे करीता राज्य शासनाशी पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे. मात्र अद्यापी शासनाकडून महानगरपालिकेला उत्तर प्राप्त झालेले नाही.

त्यामुळे प्राप्त होणा ऱ्या व झालेल्या अनुदानाची मर्यादा, महानगरपालिकेची आर्थिक स्थिती इत्यादी बाबी विचारात घेऊन या प्राप्त होणाऱ्या एकुण रूपये ६.२५ कोटी अनुदानातून एकच प्रकल्प हाती घेणे शक्य असल्याने व सदरचे कामास संयुक्त स्वरूपात मा.पालिका सर्वसाधारण सभेने यापुर्वी विषय क्र.३०१ दि.२०.९.२००८ अन्वये मंजुरी प्रदान केली आहे. या ठरावात (१) बनेवाडी, (२) प्राणी संग्रहालय, सिध्दार्थ उद्यान परिसर, (३) कांचनवाडी, जुने ऑक्सीडेशन पॉंड परिसर, (४) डॉ.सलीम अली सरोवर परिसर, (५) जाधववाडी परिसर या ठिकाणी व या व्यतिरिक्त उपलब्ध होणाऱ्या सोईच्या ठिकाणी आवश्यक त्या क्षमतेचे सिवेज ट्रिटमेंट प्लॉन्ट बांधणे चा समावेश आहे. या संमत केलेल्या ठरावाच्या आधारे डॉ.सलीम अली सरोवर परिसर येथे उक्त नमूद प्रमाणे ५ द.ल.लि. क्षमतेचा सिवेज ट्रिटमेंट प्लॉन्ट बांधणेसाठी अंदाजपत्रकास सर्वसाधारण सभा दिनांक १९.१२.२००८ विषय क्र.३६९ नुसार मान्यता मिळाली आहे.

उक्त मंजुरी नुसार सदर कामासाठी रितसर खुली निविदा मागविण्यात आली होती. सदरच्या निविदे मध्ये खालील नमूद कंत्राटदारांची निविदा प्राप्त झाल्या आहेत.

प्राप्त निविदांचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | मे.ग्रीन लँड अग्रोटेक प्रा.लि. | कागदपत्रांची पुर्तता करत नसल्याने अपात्र |
| २. | मे.किर्लोस्कर ब्रदर्स प्रा.लि. | अं.प.दरापेक्षा ९.३०% जास्त दराने |
| ३. | मे.गोडवाना इंजिनिअर्स प्रा.लि. | अं.प.दरापेक्षा ७.९७% जास्त दराने |
| ४. | मे.एच.एन.बी. इंजिनिअर्स प्रा.लि. | अं.प.दरापेक्षा ४.८९% जास्त दराने |
| ५. | मे.ॲक्वाटेक सोलूशन्स प्रा.लि. | अं.प.दरापेक्षा ४.८०% जास्त दराने |

वरील नुसार तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दर हे मे.ॲक्वाटेक सोलूशन्स प्रा.लि., पुणे यांचे असून ते अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.८०% जास्त आहे. सदरील सिवेज ट्रिटमेंट प्लान्ट हा कंत्राटदाराने सुरूवातीस तीन महिने प्रायोगिक तत्वावर चालवावयाचा असून, पुढील पाच वर्षे त्याचे ऑपरेशन आणि मेन्टेनन्स त्यांनी करावयाचे आहे. हा सर्व खर्च या निविदा दरात समाविष्ट आहे. या कामासाठी महानगरपालिकेने अर्थसंकल्प २००९-१० मध्ये रूपये ४.०० कोटीची (अर्थसंकल्प पुस्तिका पान क्रमांक EE-Abs-B ३) तरतूद केली आहे. सदरचे काम वर्ष २००९-१० व २०१०-११ या वर्षात पूर्ण करावयाचे असून, या कामासाठी लागणारी उर्वरीत तरतूद आगामी अर्थसंकल्प सन २०१०-११ मध्ये करण्यात येईल.

तरी सर्वात कमी दराची मे.ॲक्वाटेक सोलूशन्स प्रा.लि., पुणे यांची प्राप्त निविदा मंजुरीस्तव मा.स्थायी समिती समोर सादर करण्याबाबत मा.आयुक्त यांनी शिफारस केली आहे. तरी मे.ॲक्वाटेक सोलूशन्स प्रा.लि., पुणे यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.८०% जास्त दराची निविदा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**<u>संवाद :</u>**

श्री.रविकांत गवळी : याबाबतीत मा.आयुक्त आणि मा.सभापती यांचे अभिनंदन करण्यात येते. मा.आयुक्तांनी मिटींग सोडून अधिकाऱ्यांसह तपासणी केली. बैठक तहकुब करून स.सदस्य व मा.आयुक्त प्रशासनास स्थळ पहाणी करण्याकरीता गेले

होते. डॉ.सलिम अली पक्षीतज्ञ होते त्यांचे नाव देण्यात आले आहे. तलावात देश विदेशातुन पक्षी येतात त्या तलावात ड्रेनेजचे पाणी मिसळत असल्यामुळे पाणी दुषित होत होते. यानुषंगाने स्थायी समितीने मंजूरी दिली. प्रशासनाकडुन त्वरीत कारवाई झाली. प्रस्ताव मंजूरीस्तव स्थायी समितीकडे आला. सदरील काम त्वरीत सुरू करण्यात यावे.

श्री.सिताराम सुरे : या ठरावात बनेवाडी, प्राणी संग्रहालय, सिध्दार्थ उद्यान परिसर, कांचनवाडी, डॉ.सलीम अली सरोवर, जाधववाडी या ठिकांणाव्यतिरिक्त जे चार सिवेज ट्रिटमेंट प्लॉन्ट उभारणार होते ते रद्द करण्यात आले आहे काय?

श्री.भगवान घडमोडे : यापुर्वीचे ट्रिटमेंट प्लॉन्टची स्थिती बाबतही खुलासा करण्यात यावा.

कार्य.अभियंता(श्री.पानझडे): सर्वसाधारण सभा तसेच स्थायी समितीच्या आदेशानंतर पाच ट्रिटमेंट प्लॉन्ट सुरू करायचे होते परंतु बजेट अभावी टॉप प्रायरोटीवर सलिम अली सरोवर येथील काम करत आहे. बनेवाडी येथील डीपीआर तयार करून शासनाकडे मंजुरीसाठी सादर केलेले आहे. उरलेले जे ट्रिटमेंट प्लॉन्ट आहे त्याबाबतीत जे नविन प्रोजेक्ट रिपोर्ट तयार करायचा आहे त्यात त्यांचा समावेश करण्यात येणार आहे.

श्री.सिताराम सुरे : जाधववाडी येथे ड्रेनेजची कायम समस्या आहे तसेच ड्रेनेज लाईनची डिप खोलवर आहे. जाधववाडी येथे ट्रिटमेंट प्लॉन्ट घेणार आहेत काय?

कार्य.अभियंता(श्री.पानझडे): बाराव्या वित्त आयोगाकडुन अंदाजपत्रक 50 लाखाचे आहे. तेथील कामास 120 लाख रूपये लागतात तुर्त 50 लाखाचे इस्टीमेट केलेले आहे. जसा जसा निधी उपलब्ध होईल त्याप्रमाणात प्रोव्हीजन करणार आहे.

श्री.प्रशांत देसरडा : ट्रिटमेंट प्लॉन्ट कशावर चालतो.

कार्य.अभियंता(श्री.पानझडे): ट्रिटमेंट प्लॉंन्ट विजेवर चालतो, पाचवर्ष एजन्सी फ्रि ऑफ कॉस्ट करणार आहे. तशी निविदा काढली होती.

मा.सभापती :शहरामधे सध्या किती एसटीपी प्लॉंन्ट आहे खुलासा करण्यात यावा.

कार्य.अभियंता(श्री.पानझडे):आपल्याकडे सध्या एक ऑक्सीडेशन पॉंडच्या स्वरूपात जी enitial stage ची ट्रिटमेंट असते त्या ट्रिटमेंटच्या स्वरूपातला एमजीपीने बांधलेला असा ऑक्सीडेशन पॉंडचा एक प्रकल्प होता परंतु तो सध्या बंद पडलेला आहे. चिकलठाणा येथील 6.5 एमएलडी कॅपेसिटीचा एक एसटीपी आहे. तो आत्तापर्यंत चालु होता परंतु लेबरच्या प्रॉब्लम आणि त्या ठिकाणच्या काही दुरूस्त्या होत्या त्या दुरूस्त्या केलेल्या आहेत. लेबरच्या समस्येबाबत मा.आयुक्तांनी पहाणी केलेली आहे. लेबरची समस्याही दोन दिवसांमधे सुटणार आहे व तेथील एसटीपी लवकरच सुरू होणार आहे. तिसरा एसटीपी झाल्टा येथील आहे. त्याबाबतीत माझ्याकडे माहिती नाही त्यामुळे तुर्त माहिती सांगता येणार नाही.

मा.सभापती : विषय क्रमांक 194 मंजूर करण्यात येतो.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : लोकप्रतिनिधींच्या निधीतुन जे सभागृह बांधले जातात ते सभागृह महानगरपालिकेला भाडयाने देता येतात का? देता येत असेलतर तरतुद

दाखविण्यात यावी व किती सभागृह भाडयाने दिलेले आहे आणि किती भाडे आकारले जाते.

मालमत्ता विभाग : महानगरपालिकेच्या ठिकाणी असलेले विविध भुखंड किंवा मोकळया जागा असतील अशा भुखंडावर किंवा मोकळया जागेवर मा.आमदार, मा.खासदार असो किंवा इतर कोणत्याही निधीद्वारे आपल्या महानगरपालिकेच्या परवानगीनुसार त्या भुखंडाच्या जास्तीत जास्त 200 स्के.फुटापर्यंत बांधकाम करण्याची तरतुद आहे. T.P. नियमाप्रमाणे तशी तरतुद आहे त्या प्रमाणे हि भुखंड किंवा सभागृह बांधलेले असेल तर ती मालमत्ता महानगरपालिकेस हस्तांतरण केली जाते आणि ती मालमत्ता महानगरपालिकेची असल्याने ती आपण मा.सभागृह यांचे निर्णयानुसार ठरविण्यात आलेल्या रेट नुसार किंवा डिएसआर नुसार सभागृह जो निर्णय घेईल त्याप्रमाणे गरजु नागरीकांना देण्यात येईल.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : ज्या उद्देशाकरीता सभागृह बांधलेले आहे तो महानगरपालिकेला भाडयाने देता येतो का?

मालमत्ता अधिकारी : भाडयाने देता येतो.

श्री.प्रशांत देसरडा : सर्वसाधारण सभेने असा ठराव घेतला होता की, सभागृहामधील फॅन व इतर साहित्य मिळणार नाही. प्रत्येक सभागृहाला एक हजार प्रमाणे द्यावे. बऱ्याचश्या वेळेस लेआउटच्या लोकांची तक्रार येवु लागली त्यानंतर त्यात सुधारणा केली त्या लेआउटमधील जे लेआउटधारक आहे त्यांचे एनओसीने एखाद्या ट्रस्टने जर हॉल मागीतला तर पुर्वी रेडीरेक्नर रेटने भाडयाने देत होतो आता एक हजार रूपये रेटने व सेवाशुल्क वेगळा अशा रितीने देतो.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : भाडयाने देता येत असेल तर कायद्यामधे तरतुद दाखविण्यात यावी.

श्री.रविकांत गवळी : संस्थेने भाडयाने मागीतले असेलतर एक हजार रूपये रेटने भाडयाने देण्यात यावे.

मा.सभापती :मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 79 (ब) मध्ये तसे अधिकार महानगरपालिकेला आहे. तशी परवानगी स्थायी समितीची घ्यावी अशी तरतुद कायद्यात आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे राज्य शासनाने जाहीर केलेल्या "मराठवाडा विकास कार्यक्रम २००७" मधील सिवेज ट्रिटमेंट व्यवस्थापन या लेखाशिर्षांतर्गत प्राप्त अनुदानातून औरंगाबाद महानगरपालिका हद्दीत डॉ.सलीम अली सरोवर परिसरात ५ द.ल.लि. क्षमतेचा सिवेज ट्रिटमेंट प्लॉन्ट (STP) उभारणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.८०% जास्त दराची मे.ॲक्वाटेक सोलूशन्स प्रा.लि., पुणे यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

<u>ऐनवेळचे विषय</u>

मा. सभापती : ऐनवेळी आलेले सर्व विषय मंजूर करण्यात येतात. ऐणवेळी आलेल्या निवीदाही मंजूर करण्यात येतात. स.सदस्य श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर यांनी

सुचविल्यानुसार लोकप्रतिनिधी यांचे निधीतुन बांधण्यात आलेल्या सभागृह भाडयाने देतांना स्थानिक नागरिकांना प्राधान्य देण्यात यावे.

**विषय क्र. १९५ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.३९ अंतर्गत शहागंज चमन परिसरातील सरदार वल्लभभाई पटेल यांचा अर्धाकृती पुतळा काढुन नवीन पुर्णाकृती पुतळा उभारणे या कामाचे अंदाजपत्रक सा.बां. खात्याचे सन २००८-०९ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असुन अंदाजपत्रकीय रक्कम रू.१९,९४,०००/- होत आहे. सदरील काम सन २००९-१० च्या अर्थसंकल्पात पुतळे देखभाल/दुरूस्ती/खरेदी या लेखाशिर्ष अंतर्गत प्रस्तावित आहे. प्रस्तावित अंदाजपत्रकास मा.आयुक्त महोदय यांनी प्रशासकीय मंजुरी देवुन प्रस्ताव स्थायी समिती समोर ठेवण्यास शिफारस केलेली आहे.

तरी रक्कम रू.१९,९४,०००/- चे अंदाजपत्रकाचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.३९ अंतर्गत शहागंज चमन परिसरातील सरदार वल्लभभाई पटेल यांचा अर्धाकृती पुतळा काढुन नवीन पुर्णाकृती पुतळा उभारणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.१९,९४,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १९६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मो.फाजलपुरा, हर्षनगर येथील महानगरपालिकेची शाळा विनंती केल्यानुसार ज्योती विद्या मंदिर यांना भाडेतत्वावर देणे संदर्भात मा.आयुक्त साहेब, महानगरपालिका, औरंगाबाद यांची मान्यता झाली असुन भाडे समितीचे सिध्द शिघ्र गणक नुसार दर ठरविण्यात आलेले आहेत. तांत्रिक अहवालावरून असे लक्षात येते की, सदरील शाळेचे बांधकाम जुने झालेले असुन दुरूस्तीची गरज आहे. महानगरपालिकेस लाखो रूपये सध्या खर्च करणे शक्य नाही. कारण सदरील शाळेची विद्यार्थी हजेरी पटावरील संख्या इयत्ता १ ते ४ थी ३४ असुन उपस्थित संख्या १८ ते २० असते. शिक्षण विभागाच्या अटी शर्ती नुसार सदरील संस्थेस वर्ग ४ था च्या पुढे वर्ग चालविण्यास मान्यता देण्यात आलेली आहे व इयत्ता १ली ते ४थी महानगरपालिका वर्ग चालवेल. जणे करून महानगरपालिकेची इयत्ता १ ते ४ थी विद्यार्थी संख्या वाढण्याची शक्यता वाटते.

करीता ज्योती विद्या मंदिर संस्थेस खोल्या भाडे तत्वावर सिध्द शिघ्र गणक रू.९९.४० प्रति चौ.मी. प्रति माह व मासिक भाड्याच्या बारा पट अनामत रक्कम व एन.ए. व तत्सम कर महानगरपालिकेच्या अटी-शर्ती नुसार करारनामा करून भाडे तत्वावर देणेस्तव व विचारास्तव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.फाजलपुरा, हर्षनगर येथील महानगरपालिकेची शाळा विनंती केल्यानुसार ज्योती विद्या मंदिर यांना शिक्षण विभागाच्या अटी शर्ती नुसार सदरील संस्थेस वर्ग ४ था च्या पुढे वर्ग चालविण्यास मान्यता दिल्यानुसार सिध्द शिघ्र गणक रू.९९.४० प्रति चौ.मी. प्रति माह व मासिक भाड्याच्या बारा पट अनामत रक्कम व एन.ए. व तत्सम कर महानगरपालिकेच्या अटी-शर्ती नुसार करारनामा करून भाडे तत्वावर देणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १९७ :**

मा.आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांचे मंजुरीनुसार उप आयुक्त (सिडको) महानगरपालिका, औरंगाबाद हे प्रस्ताव सादर करीत आहे की, महानगरपालिकेच्या मालकीचे सर्व्हे नं.१२ आरक्षण साईट क्र.२६२ येथील खुली जागा बी.ओ.टी.तत्वाद्वारे विकसीत करण्यात आलेली असून सदरील ठिकाणी व्हेजीटेबल मार्केटसाठी ४० कायमस्वरूपी दुकाने तयार करण्यात आलेली आहेत. प्रत्येकी दुकानाचे चटई क्षेत्रफळ ६.०० चौ.मी.(सहा चौरस मीटर) असे आहे. सदरील दुकाने निविदा पध्दतीने देण्यासाठी उप अभियंता, बी.ओ.टी.कक्ष प्रमुख, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी जा.क्र.मनपा/बीओटी/१०१६/२००९ दिनांक २७.१.२००९ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

सदरील ठिकाणच्या प्रत्येकी ६.०० चौ.मी. दुकानासाठी रक्कम रू.७१ प्रती चौ.मी. प्रती माह व मासिक भाड्याच्या बारापट अनामत रक्कम आकारणे योग्य. उक्त नमुद ठिकाणचे दुकाने व्हेजीटेबल मार्केटसाठी भाडेतत्वावर देणेकरीता स्थानिक वर्तमानपत्रात जाहीर प्रगटन देवुन निविदा काढणे योग्य होईल.

करीता प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या मालकीचे सर्व्हे नं.१२ आरक्षण साईट क्र.२६२ येथील खुली जागा बी.ओ.टी.तत्वाद्वारे विकसीत केलेल्या ठिकाणी व्हेजीटेबल मार्केटसाठी ४० कायमस्वरूपी दुकाने तयार करण्यात आलेली ठिकाणच्या प्रत्येकी ६.०० चौ.मी. दुकानासाठी रक्कम रू.७१ प्रती चौ.मी. प्रती माह व मासिक भाड्याच्या बारापट अनामत रक्कम आकारून उक्त नमुद ठिकाणचे दुकाने व्हेजीटेबल मार्केटसाठी भाडेतत्वावर देणेकरीता स्थानिक वर्तमानपत्रात जाहीर प्रगटन देवुन निविदा काढणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १९८ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मा.स्थायी समितीची सभा दि.७/८/२००९ ठराव क्र.६४ अन्वये साईनगर महानगरपालिका व्यापारी संकुलातील दुकान क्र.३ ही श्री.भागचंद पारख यांना देणे बाबतचा ठराव पारित करून भाडे तत्वावर देणे बाबत मान्यता देण्यात आली होती.

परंतु महानगरपालिकेतर्फे सदरील दुकानाचे जाहीर निविदा काढण्यात आली. ठराव नंतर निविदा काढल्यामुळे श्री.भागचंद पारख यांना सदरील निविदा विकत घेतली होती. स्थायी समितीने दि.७/८/२००९ ठराव क्र.६४ अन्वये त्यांना भाडेतत्वावर देण्यास मान्यता दिल्याने त्यांनी सदरील निविदा पध्दतीत भाग घेतला नाही. या ठरावाची प्रशासनाने अंमलबजावणी न करता, निविदा उघडल्यामुळे श्री.भागचंद पारख यांच्यावर अन्याय झाला आहे.

दि.७/११/२००९ रोजी मा.सर्वसाधारण सभेत ठरलेल्या धोरपणाप्रमाणे महापालिकेच्या उत्पन्नात भर पडेल यासाठी साईनगर व्यापारी संकुलातील (दुकान क्र.१ च्या लगत) दक्षिण बाजुस अंदाजे १०'x१५' ची खुली जागा असून त्यांचा अनाधिकृत वापर होत असल्याचे समजते. सदर मोकळी जागा श्री.भागचंद पारख यांना (प्रतिमहा रू.२००/-) प्रमाणे ३३ वर्षासाठी देऊन सदरील जागेवर संबंधीताने स्वखर्चाने बांधकाम करून द्यावे.

करीता प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

सुचक : सतीश कटकटे अनुमोदक : प्रशांत देसरडा

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्री.भागचंद पारख यांना साईनगर महानगरपालिका व्यापारी संकुलातील (दुकान क्र.१ च्या लगत) दक्षिण बाजुस अंदाजे १०'x१५' ची खुली जागा असून त्यांचा

अनाधिकृत वापर होत असल्याचे समजते. सदर मोकळी जागा श्री.भागचंद पारख यांना (प्रतिमहा रू.२००/-) प्रमाणे ३३ वर्षासाठी देऊन सदरील जागेवर संबंधीताने स्वखर्चाने बांधकाम करून द्यावे या अटीवर भाडेतत्वावर देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १९९ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र. ५० सुराणानगर अंतर्गत विद्यानिकेतन कॉलनी येथे मनपाची खुली जागा असून या जागेत अद्याप विकासाची कामे झाली नाहीत. मनपाच्या खुल्या जागा वापरात आली नाही तर अतिक्रमण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. मनपाच्या मालमत्तेचे संरक्षण होण्याचे दृष्टीने या ठिकाणच्या मोकळ्या जागी उद्यान विकसीत करण्याचे काम तातडीने करणे अत्यंत आवश्यक आहे. अर्थसंकल्पातील उपलब्ध तरतुदीनुसार रू.१०.०० लक्ष चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. तरी सदर काम मुं.प्रां.मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये उपलबध ठेकेदारा मार्फत अं.प.दरावर तातडीने करून घेण्याचे मंजुरीस्तव सादर.

प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

सुचक : प्रशांत देसरडा अनुमोदक : सतीश कटकटे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र. ५० सुराणानगर अंतर्गत विद्यानिकेतन कॉलनी येथे मनपाची खुली जागा अतिक्रमण होण्याची शक्यता लक्षात घेता मनपाच्या मालमत्तेचे संरक्षण होण्याचे दृष्टीने या ठिकाणच्या मोकळ्या जागी उद्यान विकसीत करण्याचे काम तातडीने करणे अत्यंत आवश्यक असल्याने सदर काम मुं.प्रां.मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये उपलबध ठेकेदारा मार्फत अं.प.दरावर तातडीने करून घेण्यास त्यासाठी लागणाऱ्या खर्चासह सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. प्रशासनाने नियमानुसार कार्यवाही करावी. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २०० :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र. ८५ अंतर्गत रामकृष्ण सोसायटी मध्ये ड्रेनेज लाईनची सुविधा पुरविण्यात आलेली नाही. त्यामुळे या भागात ड्रेनेज लाईन तातडीने टाकावी लागणार आहे. रहिवाश्यांचे आरोग्य तसेच नागरीकांची अनेक दिवसांपासुनची मागणी असून अर्थसंकल्पात या कामासाठी रू.५.०० लक्ष तरतुद उपलब्ध आहे. कामाची तातडी लक्षात घेता वॉर्ड क्रि.८५ रामकृष्ण सोसायटी मध्ये ड्रेनेज लाईन टाकण्याचे काम, त्यासाठी लागणाऱ्या खर्चासह मुं.प्रां.मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये उपलबध ठेकेदारा मार्फत अं.प.दरावर तातडीने करून घेण्याचे मंजुरीस्तव सादर.

प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

सुचक : प्रल्हाद निमगांवकर अनुमोदक : प्रशांत देसरडा

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र. ८५ अंतर्गत रामकृष्ण सोसायटी मध्ये ड्रेनेज लाईनची सुविधा पुरविण्यात आलेली नाही. रहिवाश्यांचे आरोग्य तसेच नागरीकांची अनेक दिवसांपासुनची मागणी तसेच कामाची तातडी लक्षात घेता वॉर्ड क्रि.८५ रामकृष्ण सोसायटी मध्ये ड्रेनेज लाईन टाकण्याचे काम, त्यासाठी लागणाऱ्या खर्चासह मुं.प्रां.मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये उपलबध ठेकेदारा मार्फत अं.प.दरावर तातडीने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. प्रशासनाने नियमानुसार कार्यवाही करावी. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २०१ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र. ९९ शिवाजीनगर मधील ड्रेनेज लाईन दुरूस्तीच्या कामासाठी सन २००९-१० च्या अर्थसंकल्पात ५.०० लक्षची आर्थिक तरतुद उपलब्ध आहे. या भागातील ड्रेनेज लाईन वारंवार चोकअप होऊन दुर्गंधीमुळे रोगराई पसरण्याची शक्यता नाकारता येत नाही. रहिवाश्यांचे आरोग्य तसेच नागरीकांचे तक्रारी लक्षात घेता अर्थसंकल्पातील उपलब्ध तरतुदीनुसार खालील दर्शविलेली कामे मुं.प्रां.मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये उपलबध ठेकेदारा मार्फत अं.प.दरावर तातडीने करून घेण्याचे मंजुरीस्तव सादर.

१. वॉर्ड क्र.९९ शिवाजीनगर मधील ११ व्या योजनेतील अंतर्गत ड्रेनेज लाईन दुरूस्त करणे - २.५० लक्ष

२. वॉर्ड क्र.९९ शिवाजीनगर येथील १२ व्या योजनेतील अंतर्गत ड्रेनेज लाईन दुरूस्त करणे - २.५० लक्ष

प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

सुचक : सतीश कटकटे　　　　　　　　अनुमोदक : रविकांत गवळी

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र. ९९ शिवाजीनगर भागातील ड्रेनेज लाईन वारंवार चोकअप होऊन दुर्गंधीमुळे रोगराई पसरण्याची शक्यता नाकारता येत नाही. रहिवाश्यांचे आरोग्य तसेच नागरीकांचे तक्रारी लक्षात घेता अर्थसंकल्पातील उपलब्ध तरतुदीनुसार खालील दर्शविलेली कामे मुं.प्रां.मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये उपलबध ठेकेदारा मार्फत अं.प.दरावर तातडीने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. प्रशासनाने नियमानुसार कार्यवाही करावी

१. वॉर्ड क्र.९९ शिवाजीनगर मधील ११ व्या योजनेतील अंतर्गत ड्रेनेज लाईन दुरूस्त करणे - २.५० लक्ष

२. वॉर्ड क्र.९९ शिवाजीनगर येथील १२ व्या योजनेतील अंतर्गत ड्रेनेज लाईन दुरूस्त करणे - २.५० लक्ष

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २०२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र. ७३ अंतर्गत एन-२ कम्युनिटी सेंटर येथील कंपौंड वॉल पुर्णपणे मोडकळीस आलेली असून केव्हाही पडून अपघात होण्याची शक्यता निर्माण झालेली आहे. सदरील संरक्षक भिंतीची दुरूस्तीचे काम त्वरीत करून घेणे गरजेचे असून अर्थसंकल्पीय तरतुदीच्या अनुषंगाने रू.३.५० लक्षचे अंदाजपत्रक तयार केलेले आहे. कामाची तातडी लक्षात घेता वॉर्ड क्र.७३ एन-२ कम्युनिटी सेंटर येथील कंपौंड वॉलची दुरूस्तीचे काम त्यासाठी लागणाऱ्या खर्चासह मुं.प्रां.मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये उपलबध ठेकेदारा मार्फत अं.प.दरावर तातडीने करून घेण्याचे मंजुरीस्तव सादर.

करीता प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

सुचक : दामोधर शिंदे　　　　　　　　अनुमोदक :रविकांत गवळी

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र. ७३ अंतर्गत एन-२ कम्युनिटी सेंटर येथील कंपौंड वॉल पुर्णपणे मोडकळीस आलेली अपघात होण्याची शक्यता लक्षात घेता सदरील संरक्षक भिंतीची दुरूस्तीचे काम तातडीने करून घेण्यासाठी अर्थसंकल्पीय तरतुदीच्या अनुषंगाने रू.३.५० लक्षचे अंदाजपत्रकानुसार वॉर्ड क्र.७३ एन-२ कम्युनिटी सेंटर येथील कंपौंड वॉलची दुरूस्तीचे काम त्यासाठी लागणाऱ्या खर्चासह मुं.प्रां.मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये उपलब्ध ठेकेदारा मार्फत अं.प.दरावर तातडीने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. प्रशासनाने नियमानुसार कार्यवाही करावी. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २०३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.९७ राहुलनगर, बनेवाडी, सादतनगर मध्ये विविध गल्ल्यांमध्ये मा.सभापती, स्थायी समिती यांनी स्थळ पाहणी केली आहे. सदर गल्ल्या अरूंद असून या ठिकाणी कचरा साचल्याने दुर्गंधी पसरलेली असून तात्काळ पेव्हर ब्लॉक बसविणेच्या सुचना मा.सभापती यांनी संबंधीत अधिकाऱ्यांना दिलेल्या असून या कामासाठी रू.९.८० लक्ष चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. काम तातडीने करावयाचे असल्याने मुं.प्रां.मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये उपलब्ध ठेकेदारा मार्फत अं.प.दरावर तातडीने करून घेण्याचे मंजुरीस्तव सादर.

प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.९७ राहुलनगर, बनेवाडी, सादतनगर मध्ये विविध गल्ल्यांमध्ये कचरा साचून दुर्गंधी पसरलेली असल्याने तात्काळ पेव्हर ब्लॉक बसविणेच्या कामासाठी रू.९.८० लक्ष चे अंदाजपत्रकानुसार सदरील काम मुं.प्रां.मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये उपलब्ध ठेकेदारा मार्फत अं.प.दरावर तातडीने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. प्रशासनाने नियमानुसार कार्यवाही करावी.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २०४ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र. ५५ कैसरकॉलनी अंतर्गत विविध विकास कामांसाठी सन २००९-१० च्या अर्थसंकल्पात आर्थिक तरतुद करण्यात आलेली आहे. या भागातील ड्रेनेज लाईन वारंवार चोकअप होऊन दुर्गंधी पसरून नागरीकांचे आरोग्यास अपाय होऊ शकतो. वॉर्डातील नागरीकांचे आरोग्याचा व ड्रेनेजसंबंधीच्या तक्रारींचा विचार करता अर्थसंकल्पातील उपलब्ध तरतुदीनुसार खालील दर्शविलेली कामे मुं.प्रां.मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये उपलब्ध ठेकेदारा मार्फत अं.प.दरावर तातडीने करून घेण्याचे मंजुरीस्तव सादर.

१. वॉर्ड क्र.५५ कैसर कॉ. येथे विविध ठिकाणी ड्रेनेज लाईनची दुरूस्ती करणे - ५.०० लक्ष
२. वॉर्ड क्र.वॉर्ड क्र.५५ मध्ये हमीदभाई यांच्या घरासमोर मोठ्या व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे - ३.०० लक्ष
३. वॉर्ड क्र.५५ कैसर कॉलनी येथे विविध ठिकाणी ड्रेनेज लाईनची दुरूस्ती करणे - ३.०० लक्ष

प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

सुचक : सिताराम सुरे  अनुमोदक : दामोधर शिंदे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र. ५५ कैसरकॉलनी अंतर्गत करावयाचे कामांसाठी सन २००९-१० च्या अर्थसंकल्पात आर्थिक तरतुद उपलब्ध असून या भागातील ड्रेनेज लाईन वारंवार चोकअप होऊन दुर्गंधी पसरल्यामुळे ड्रेनेजसंबंधीच्या तक्रारींचा विचार करता अर्थसंकल्पातील उपलब्ध तरतुदीनुसार खालील दर्शविलेली कामे मुं.प्रां.मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये उपलब्ध ठेकेदारा मार्फत अं.प.दरावर तातडीने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. प्रशासनाने नियमानुसार कार्यवाही करावी.

१. वॉर्ड क्र.५५ कैसर कॉ. येथे विविध ठिकाणी ड्रेनेज लाईनची दुरूस्ती करणे. - ५.०० लक्ष
२. वॉर्ड क्र.वॉर्ड क्र.५५ मध्ये हमीदभाई यांच्या घरासमोर मोठ्या व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे. - ३.०० लक्ष

३. वॉर्ड क्र.५५ कैसर कॉलनी येथे विविध ठिकाणी ड्रेनेज लाईनची दुरूस्ती करणे. - ३.०० लक्ष

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २०५ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र. १३ विश्वासनगर अंतर्गत N-१३ A मध्ये सिडकोने टाकलेली ड्रेनेज लाईन जुनी असून कमी व्यासाची आहे. लोकसंख्या वाढल्यामुळे विविध ठिकाणी असलेली RCC ड्रेनेज लाईन वारंवार चोकअप होऊन दुर्गंधी पसरते. यामुळे नागरीकांचे आरोग्य धोक्यात आलेले असून वॉर्डातील नागरीकांच्या असंख्य तक्रारी प्राप्त होत आहेत. तेथील रहिवाश्यांचे आरोग्याचा विचार करता तातडीने जुनी ड्रेनेज लाईन बदलुन मोठ्या व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणेचे काम करणे अत्यंत आवश्यक असुन अर्थसंकल्पातील उपलब्ध तरतुदीनुसार रू.९,९८,२००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. तरी सदर काम मुं.प्रां.मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये उपलब्ध ठेकेदार एम.डी.पटेल यांचेमार्फत अं.प.दरावर तातडीने करून घेण्याचे मंजुरीस्तव सादर.

प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

सुचक : सतीश कटकटे अनुमोदक : सिताराम सुरे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र. १३ विश्वासनगर अंतर्गत N-१३ A मध्ये विविध ठिकाणी असलेली RCC ड्रेनेज लाईन वारंवार चोकअप झाल्याने नागरीकांचे आरोग्य धोक्यात आलेले असल्याने तेथील रहिवाश्यांचे आरोग्याचा विचार करता तातडीने जुनी ड्रेनेज लाईन बदलुन मोठ्या व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणेचे काम रू.९,९८,२००/- चे अंदाजपत्रकानुसार सदर काम मुं.प्रां.मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये उपलब्ध ठेकेदार एम.डी.पटेल यांचेमार्फत अं.प.दरावर तातडीने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. प्रशासनाने नियमानुसार कार्यवाही करावी. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २०६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सध्या विविध ठिकाणी डांबरीकरणाच्या कामांसाठी प्राप्त होणाऱ्या निविदा 30-35% कमी दराने प्राप्त होत असल्याचे निदर्शनास आले आहे. इतक्या मोठ्या प्रमाणात कमी दरामुळे कामाची गुणवत्ता राखली जाणार नाही असे वाटते. अशा प्रकारे होणाऱ्या कामाचा दर्जा टिकविण्याचे दृष्टीने सभागृहाला गांभीर्याने विचार करून कठोर निर्णय घ्यावा लागणार आहे.

1. डांबरीकरणाचे काम घेणाऱ्या ठेकेदाराकडे हॉटमिक्स प्लँट तसेच या कामासाठी आवश्यक असणारी मशीनरी स्वत:च्या मालकीची असावी व त्यासंबंधीची कागदपत्रे सादर करणे बंधनकारक करण्यात यावी. याची खातरजमा मनपा अधिकाऱ्यांनी जातीने करावी.
2. 15% किंवा त्यापेक्षा जास्त कमी दराने ज्या निविदाधारकांनी निविदा भरली असेल त्यांस कार्यादेश देताना करारनाम्या मध्ये अट टाकण्यात यावी की, केलेले काम तीन वर्षापर्यंत खराब होणार नाही याची लेखी हमी घ्यावी. दिलेल्या कामावधीत रस्ते खराब झाल्यास संबंधीत ठेकेदाराने विनामुल्य दुरूस्ती करून द्यावी. या हमीपोटी संबंधीत ठेकेदाराचे बीलाच्या रक्कमेच्या 15% रक्कम दोन वर्षासाठी अनामत म्हणुन मनपा फंडात जमा करावी. तीन वर्षे रस्ते सुस्थितीत राहिल्यास संबंधीताची 15% रक्कम परत करण्यात यावी अन्यथा सदरची रक्कम जप्त करावी.

3. संबंधीत ठेकेदाराने डांबरीकरणाचे कामात वापरलेले डांबर कोणत्या कंपनीचे आहे त्या कंपनीचे बील कार्यालयाकडे सादर करणे बंधनकारक आहे.
4. नियमानुसार ठेकेदाराचा स्वतःच्या मालकीचा हॉटमिक्स प्लँट प्रत्यक्ष साईपासून 30 कि.मी. च्या आंत असावा.
5. या व इतर नेहमीच्या सर्व अटी-शर्ती करारनाम्यात समाविष्ट कराव्यात. संबंधीत ठेकेदार अटी-शर्तीचे पालन करण्यास असमर्थ ठरला तर संबंधीतास काळ्या यादीत टाकण्याबाबतची कार्यवाही प्रस्तावित करण्यात यावी.
6. नियमानुसार प्रत्यक्ष साईटवर डांबरीकरणाचे कामासाठी आलेले मटेरीयलचे तापमान नियमानुसार तपासणे बंधनकारक आहे. या अटीचा समावेश करारनाम्यात करण्यात यावा व या नियमाची अंमलबजावणी काटेकोरपणे करण्यात यावी.
7. संबंधीत ठेकेदाराने डांबरीकरणाचे कामात वापरलेले डांबर कोणत्या कंपनीचे आहे त्या कंपनीचे बील कार्यालयाकडे सादर करणे बंधनकारक असावे.
8. सन 2009-10 च्या अर्थसंकल्पातील सर्व वॉर्ड कार्यालयामार्फत सुरू असलेल्या व निविदा प्रक्रीया पुर्ण झालेल्या कामांची सविस्तर माहिती स्थायी समितीकडे सादर करण्यात यावी. आतापर्यंत झालेल्या कामांची तसेच प्रत्यक्ष काम सुरू असतांना तपासणी करण्यासाठी मनपाचे तांत्रिक अधिकारी व स्थायी समितीचे चार सदस्यांचा समावेश असलेली समिती गठीत करण्यात यावी. या समितीच्या अहवालानुसार काम समाधानकारक असल्यासच पुढील कार्यवाही करण्यात यावी.

प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

| | | | |
|---|---|---|---|
| सुचक : | प्रशांत देसरडा, भगवान घडमोडे,<br>सिताराम सुरे, दत्ताभाऊ पाथ्रीकर,<br>नारायण कुचे, कचरू सोनवणे,<br>प्रल्हाद निमगांवकर, विनायक पांडे. | अनुमोदक : | रविकांत गवळी, सतीश कटकटे,<br>मोमीन सफिया फिरदौस,<br>मेहरून्नीसा खान |

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार विविध ठिकाणी डांबरीकरणाच्या कामांसाठी प्राप्त होणाऱ्या निविदा मोठ्या प्रमाणात कमी दरामुळे कामाची गुणवत्ता राखली जाणार नाही व होणाऱ्या कामाचा दर्जा टिकविण्याचे दृष्टीने खालील अटी-शर्ती घालण्यात याव्यात असे सर्वानुमते ठरले.

1. डांबरीकरणाचे काम घेणाऱ्या ठेकेदाराकडे हॉटमिक्स प्लँट तसेच या कामासाठी आवश्यक असणारी मशीनरी स्वतःच्या मालकीची असावी व त्यासंबंधीची कागदपत्रे सादर करणे बंधनकारक करण्यात यावी. याची खातरजमा मनपा अधिकाऱ्यांनी जातीने करावी.
2. 15% किंवा त्यापेक्षा जास्त कमी दराने ज्या निविदाधारकांनी निविदा भरली असेल त्यांस कार्यादेश देताना करारनाम्या मध्ये अट टाकण्यात यावी की, केलेले काम तीन वर्षापर्यंत खराब होणार नाही याची लेखी हमी घ्यावी. दिलेल्या कामावधीत रस्ते खराब झाल्यास संबंधीत ठेकेदाराने विनामुल्य दुरूस्ती करून द्यावी. या हमीपोटी संबंधीत ठेकेदाराचे बीलाच्या रक्कमेच्या 15% रक्कम गुणवत्ता पडताळणीसाठी एक वर्षासाठी थांबविण्यात यावी.
3. संबंधीत ठेकेदाराने डांबरीकरणाचे कामात वापरलेले डांबर कोणत्या कंपनीचे आहे त्या कंपनीचे बील कार्यालयाकडे सादर करणे बंधनकारक आहे.

4. नियमानुसार ठेकेदाराचा स्वतःच्या मालकीचा हॉटमिक्स प्लँट प्रत्यक्ष साईपासून 30 कि.मी. च्या आंत असावा.
5. या व इतर नेहमीच्या सर्व अटी-शर्ती करारनाम्यात समाविष्ट कराव्यात. संबंधीत ठेकेदार अटी-शर्तीचे पालन करण्यास असमर्थ ठरला तर संबंधीतास काळ्या यादीत टाकण्याबाबतची कार्यवाही प्रस्तावित करण्यात यावी.
6. नियमानुसार प्रत्यक्ष साईटवर डांबरीकरणाचे कामासाठी आलेले मटेरीयलचे तापमान नियमानुसार तपासणे बंधनकारक आहे. या अटीचा समावेश करारनाम्यात करण्यात यावा व या नियमाची अंमलबजावणी काटेकोरपणे करण्यात यावी.
7. संबंधीत ठेकेदाराने डांबरीकरणाचे कामात वापरलेले डांबर कोणत्या कंपनीचे आहे त्या कंपनीचे बील कार्यालयाकडे सादर करणे बंधनकारक असावे.
8. सन 2009-10 च्या अर्थसंकल्पातील सर्व वॉर्ड कार्यालयामार्फत सुरू असलेल्या व निविदा प्रक्रीया पुर्ण झालेल्या कामांची सविस्तर माहिती स्थायी समितीकडे सादर करण्यात यावी. आतापर्यंत झालेल्या कामांची तसेच प्रत्यक्ष काम सुरू असतांना तपासणी करण्यासाठी मनपाचे तांत्रिक अधिकारी व स्थायी समितीचे चार सदस्यांचा समावेश असलेली समिती गठीत करण्यात यावी. या समितीच्या अहवालानुसार काम समाधानकारक असल्यासच पुढील कार्यवाही करण्यात यावी.

त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २०७ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.५३ मोहल्ला बारी कॉलनी अंतर्गत कॉंक्रेटींग करणेच्या कामासाठी कामासाठी रू.५.०० लक्षची तरतुद उपलब्ध असून पावसाळ्याच्या पाण्यामुळे रस्ता खराब झालेला आहे. त्यामुळे या ठिकाणच्या रहिवाश्यांना त्रास सहन करावा लागत आहे. तरी सदरील काम तातडीने करून घेण्याकरीता या कामासाठी लागणाऱ्या खर्चासह मुं. प्रां. मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये उपलब्ध ठेकेदारा मार्फत अं.प. दरावर तातडीने करून घेण्याचे मंजुरीस्तव सादर.

सुचक : दामोधर शिंदे अनुमोदक : सिताराम सुरे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.५३ मोहल्ला बारी कॉलनी अंतर्गत पावसाचे पाण्यामुळे रस्ता खराब झालेला असल्यामुळे वॉर्ड क्र.५३ मोहल्ला बारी कॉलनी अंतर्गत कॉंक्रेटींग करणेचे काम तातडीने करून घेण्याकरीता या कामासाठी लागणाऱ्या खर्चासह मुं. प्रां. मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये उपलब्ध ठेकेदारा मार्फत अं.प. दरावर तातडीने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २०८ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.43 शरीफ कॉलनी येथे समी बेकरी व इतर ठिकाणी पावसाच्या पाण्यामुळे रस्ता खराब झाला आहे. नागरीकांचे घरात ड्रेनेजचे पाणी तुंबत असल्याने वारंवार लाईन अपरूटींग करून सुध्दा ड्रेनेज चोकअप होत आहे. करीता सदरील काम तातडीने करणे आवश्यक आहे. तसेच अराफत मस्जीद जवळील व इतर गल्ल्यामध्ये पेव्हर ब्लॉक बसविणे व दुरूस्ती करणे गरजेचे आहे. तरी खालील दर्शविलेले काम मुं.प्रां.मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये उपलबध ठेकेदारा मार्फत अं.प. दरावर तातडीने करून घेण्याचे मंजुरीस्तव सादर.

१. वॉर्ड क्र.४३ शरीफ कॉ. समी बेकरी येथे ड्रेनेज लाईन टाकणे - ५.०० लक्ष
२. वॉर्ड क्र.४३ अराफत मस्जीद जवळील गल्ल्यात पेव्हर ब्लॉक बसविणे व दुरूस्ती करणे . - २.०० लक्ष

करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : मोमीन सफिया फिरदौस अनुमोदक : सिताराम सुरे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.43 शरीफ कॉलनी येथे समी बेकरी व इतर ठिकाणी पावसाच्या पाण्यामुळे रस्ता खराब झाल्याने नागरीकांचे घरात ड्रेनेजचे पाणी तुंबत असल्याने वारंवार लाईन अपरूटींग करून सुध्दा ड्रेनेज चोकअप असून सदरील काम तातडीने करून घेण्यासाठी तसेच अराफत मस्जीद जवळील व इतर गल्ल्यामध्ये पेव्हर ब्लॉक बसविणे व दुरूस्ती करणेचे काम तातडीने करून घेण्यासाठी खालील दर्शविलेले काम मुं.प्रां.मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये उपलबध ठेकेदारा मार्फत अं.प. दरावर तातडीने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. प्रशासनाने नियमानुसार कार्यवाही करावी.

१. वॉर्ड क्र.४३ शरीफ कॉ. समी बेकरी येथे ड्रेनेज लाईन टाकणे - ५.०० लक्ष
२. वॉर्ड क्र.४३ अराफत मस्जीद जवळील गल्ल्यात पेव्हर ब्लॉक बसविणे व दुरूस्ती करणे . - २.०० लक्ष

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २०९ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र. ९९ शिवाजीनगर मध्ये बी सेक्टर अंतर्गत कॉंक्रेटींगच्या कामासाठी सन २००९-१० च्या अर्थसंकल्पात ५.०० लक्षची आर्थिक तरतुद उपलब्ध आहे. या भागातील बी सेक्टर अंतर्गत गल्लीतील कॉंक्रेटीकरणाचे काम करण्यासाठी रू.४.९८ लक्षचे अंदाजपत्रक तयार असून सदरचे काम तातडीने करून घेणे गरजेचे असल्याने मुं.प्रां.मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये उपलब्ध ठेकेदारा मार्फत अं.प.दरावर तातडीने करून घेण्याचे मंजुरीस्तव सादर.

१. वॉर्ड क्र.९९ शिवाजीनगर मधील बी-सेक्टर अंतर्गत गल्लीतील कॉंक्रेटींग करणे - ४.९८ लक्ष

प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

सुचक : दामोधर शिंदे अनुमोदक : सतीश कटकटे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र. ९९ शिवाजीनगर मध्ये बी सेक्टर अंतर्गत कॉंक्रेटींगच्या कामासाठी आर्थिक तरतुदीनुसार बी सेक्टर अंतर्गत गल्लीतील कॉंक्रेटीकरणाचे काम करण्यासाठी रू.४.९८ लक्षचे अंदाजपत्रकानुसार तयार असून सदरचे काम तातडीने करून घेणे गरजेचे असल्याने मुं.प्रां.मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये उपलब्ध ठेकेदारा मार्फत अं.प.दरावर तातडीने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. प्रशासनाने नियमानुसार कार्यवाही करावी. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २१० :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.५९ खोकडपुरा/अजबनगर पांडुरंग कॉलनी व इतर भागात कॉंक्रेटींग करणे या कामाचे अंदाजपत्रक म.जी.प्रा./सा.बां. खात्याच्या सन २००८-०९ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असुन रू.१२,८६,७००/- च्या अंदाजपत्रकास मा.स्थायी समिती दि.३/११/२००९ विषय क्र.१४८ नुसार मान्यता प्राप्त आहे. सदर कामाचे निविदा मागविण्यात आल्या

असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखे पर्यंत एकुण ३ निविदा विक्री होऊन स्वीकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत ३ निविदा दर भरून प्राप्त झाल्या असल्याचा अहवाल ई-निविदा विभागाकडून प्राप्त आहे. त्याचा तुलनात्मक तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | मे.काजी मो.फारूक मो.ईस्माईल | अं.प.दरापेक्षा २९.०१% कमी दराने |
| २. | मे. चंद्राम एन. आशन्ना | अं.प.दरापेक्षा २६.६२% कमी दराने |
| ३. | मे.टेंभुर्णीकर प्रल्हाद सुरेश | अं.प.दरापेक्षा १८.०५% कमी दराने |

उपरोक्त प्राप्त निविदांपैकी सर्वात कमी दराची निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा २९.०१% कमी दराची मे.काजी मो.फारूक मो.ईस्माईल यांची आहे. मा. आयुक्त महोदय यांनी उक्त निविदा दरास मान्यता देवून मा.स्थायी समिती सभेची मंजुरी घेणे बाबत शिफारस केली आहे.

तरी मे.काजी मो. फारूक मो. ईस्माईल यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा २९.०१% कमी दराची निविदा मान्यतेचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.५९ खोकडपुरा/अजबनगर पांडुरंग कॉलनी व इतर भागात काँक्रेटींग करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २९.०१% कमी दराची मे. काजी मो. फारूक मो. ईस्माईल यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २११ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.४५ मधील रस्ते पावसामुळे पुर्णतः उखडलेले आहेत. नागरीकांना ये-जा करण्यास खुप त्रास होत आहे. तसेच लोकांच्या तक्रारीही खुप वाढल्या आहेत. त्यामुळे सदरील ठिकाणी खालील कामे तातडीने करून घेणे गरजेचे असल्याने मुं.प्रां.मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये उपलब्ध ठेकेदारा मार्फत अं.प.दरावर तातडीने करून घेण्याचे मंजुरीस्तव सादर.

१. वॉर्ड क्र.४५ रहेमानिया कॉलनी येथे इलियास मस्जीदच्या बाजुस रस्त्यावर काँक्रीट/पेव्हर ब्लॉक बसविणे करणे — ५.०० लक्ष
२. वॉर्ड क्र.४५ अंतर्गत नवाज भाई दुधवाले यांच्या समोरील रस्त्यावर काँक्रीट/पेव्हर ब्लॉक बसविणे करणे — ५.०० लक्ष

प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

सुचक : प्रल्हाद निमगांवकर — अनुमोदक : श्रीमती मेहरून्नीसा खान

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.४५ मधील रस्ते पावसामुळे पुर्णतः उखडलेले असून लोकांच्या तक्रारीही खुप वाढल्यामुळे सदरील ठिकाणी खालील कामे तातडीने करून घेण्यासाठी मुं.प्रां.मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये उपलब्ध ठेकेदारा मार्फत अं.प.दरावर तातडीने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. प्रशासनाने नियमानुसार कार्यवाही करावी.

१. वॉर्ड क्र.४५ रहेमानिया कॉलनी येथे इलियास मस्जीदच्या बाजुस रस्त्यावर काँक्रीट/पेव्हर ब्लॉक बसविणे करणे — ५.०० लक्ष
२. वॉर्ड क्र.४५ अंतर्गत नवाज भाई दुधवाले यांच्या समोरील रस्त्यावर काँक्रीट/पेव्हर ब्लॉक बसविणे करणे — ५.०० लक्ष

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. २१२ :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मनपा वॉर्ड क्र.२७ मध्ये मो. शताब्दीनगर येथील अंतर्गत रस्ते फार खराब झालेले असुन सदर ठिकाणी कॉंक्रेटींग करणे आणि पेव्हर ब्लॉक बसविणे अत्यंत गरजेचे असुन रहीवासीयांना रहदारी तथा वाहतुकीस फार त्रास होत आहे. सदर ठिकाणी कॉंक्रेटींग व पेव्हर ब्लॉक बसविण्यास अंदाजे ५.०० लाख रूपये खर्च अपेक्षीत असून येणारे खर्चासह सदरील काम मुं.प्रां.मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये उपलब्ध ठेकेदारा मार्फत अं.प.दरावर तातडीने करून घेण्याचे मंजुरीस्तव सादर.

सुचक : मोमीन सफिया फिरदौस अनुमोदक : रविकांत गवळी

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.२७ मध्ये मो. शताब्दीनगर येथील अंतर्गत रस्ते कॉंक्रेटींग करणे आणि पेव्हर ब्लॉक बसविणे चे काम त्यासाठी लागणाऱ्या खर्चासह सदरील काम मुं.प्रां.मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये उपलब्ध ठेकेदारा मार्फत अं.प.दरावर तातडीने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. २१३ :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मनपा वॉर्ड क्र.२७ मध्ये मोहल्ला शताब्दीनगर येथील अंतर्गत रस्ते फार खराब झालेले असुन सदर ठिकाणी पेव्हर ब्लॉक बसविणे अत्यंत गरजेचे असुन रहिवासीयांना रहदारी तथा वाहतुकीस फार त्रास होत आहे. सदर ठिकाणी पेव्हर ब्लॉक बसविण्यास अंदाजे ०३ लाख रूपये खर्च येणार असुन येणारे खर्चासह सदरील काम मुं.प्रां.मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये उपलब्ध ठेकेदारा मार्फत अं.प.दरावर तातडीने करून घेण्याचे मंजुरीस्तव सादर.

सुचक : मोमीन सफिया फिरदौस अनुमोदक : रविकांत गवळी

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.२७ मध्ये मो. शताब्दीनगर येथील अत्यंत खराब झालेल्या रस्त्यावर पेव्हर ब्लॉक बसविणे चे काम त्यासाठी लागणाऱ्या खर्चासह सदरील काम मुं.प्रां.मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये उपलब्ध ठेकेदारा मार्फत अं.प.दरावर तातडीने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. २१४ :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, अर्थसंकल्प सन २००९-१० मधील मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.६५२ दिनांक ७.११.२००९ रोजी संपन्न झालेल्या सभेत प्रभाग क्र.६० सिल्लेखाना, समतानगर, येथे कॉंक्रीट पेव्हर ब्लॉक बसविणे तसेच भाग क्र.६० सिल्लेखाना, रंभापुरा येथे कॉंक्रीट व पेव्हर ब्लॉक करणे, प्रभाग क्र.६० सिल्लेखाना बडातकिया येथे कॉंक्रीट व पेव्हर ब्लॉक करणे, प्रभाग क्र.६० सिल्लेखाना संसारनगर येथे कॉंक्रीट व पेव्हर ब्लॉक करणे या कामासाठी प्रत्येकी रू.२.५० लक्ष तरतुद उपलब्ध करून दिलेली आहे. सिल्लेखाना प्रभागातील रस्त्यांची अतिशय दयनीय अवस्था झालेली असून सदर कामे तातडीने करून घेणे आवश्यक आहे.

तरी सदरील कामे त्यासाठी लागणाऱ्या खर्चासह मुं.प्रां.मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये उपलब्ध ठेकेदारा मार्फत अं.प.दरावर तातडीने करून घेण्याबाबतचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : मोमीन सफिया फिरदौस अनुमोदक : रविकांत गवळी

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.६५२ दिनांक ७.११.२००९ अन्वये उपलब्ध करून दिलेल्या तरतुदीप्रमाणे प्रभाग क्र.६० सिल्लेखाना, समतानगर, येथे काँक्रीट पेव्हर ब्लॉक बसविणे, प्रभाग क्र.६० सिल्लेखाना, रंभापुरा येथे काँक्रीट व पेव्हर ब्लॉक करणे, प्रभाग क्र.६० सिल्लेखाना बडातकिया येथे काँक्रीट व पेव्हर ब्लॉक करणे, प्रभाग क्र.६० सिल्लेखाना संसारनगर येथे काँक्रीट व पेव्हर ब्लॉक करण्याचे प्रत्येकी रू.२.५० लक्ष खर्चाची कामे तातडीने करून घेणे आवश्यक असल्याने सदरील कामे त्यासाठी लागणाऱ्या खर्चासह मुं.प्रां.मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये उपलब्ध ठेकेदारा मार्फत अं.प.दरावर तातडीने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २१५ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.६२ समतानगर अंतर्गत शनि मंदीर जवळील रस्त्यावरून महानगरपालिकेचे कोटला कॉलनी येथील पाण्याच्या टाकीवरून पाणी पुरवठा करणारे टँकर जात असल्याने हा रस्ता अत्यंत खराब झालेला आहे. रस्त्यावर जागोजागी मोठमोठे खड्डे पडलेले आहेत. डांबरीकरणाचा रस्ता पाण्याचे टँकरमुळे टिकू शकत नाही. या रस्त्यावर काँक्रेटींग करणे आवश्यक आहे. या भागात अनेक हॉस्पीटल असल्यामुळे या रस्त्यावरून रूग्णांना नेणारी वाहने, रूग्णवाहिका याच रस्त्यावरून जात असतात. म्हणुन सदरच्या रस्त्याचे काँक्रेटींगचे काम तातडीने करून घेणे गरजेचे आहे. या कामासाठी सन २००९-१० च्या अर्थसंकल्पात १५.०० लक्षची तरतुद उपलब्ध आहे. सदर काम करून घेण्यासाठी लागणाऱ्या खर्चासह मुं.प्रां.मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये उपलब्ध ठेकेदारा मार्फत अं.प.दरावर तातडीने करून घेण्याबाबतचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : सतीश कटकटे, प्रशांत देसरडा — अनुमोदक : कचरू सोनवणे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.६२ समतानगर अंतर्गत शनि मंदीर जवळील रस्त्यावरून महानगरपालिकेचे कोटला कॉलनी येथील पाण्याच्या टाकीवरून पाणी पुरवठा करणारे टँकर जात असल्याने हा रस्ता अत्यंत खराब झाला असल्यामुळे तसेच या रस्त्यावरून रूग्णांना नेणारी वाहने, रूग्णवाहिका याच रस्त्यावरून जात असतात. म्हणुन सदरच्या रस्त्याचे काँक्रेटींगचे काम तातडीने करून घेण्यास्तव उपलब्ध तरतुदीच्या अनुषंगाने सदर काम करून घेण्यासाठी लागणाऱ्या खर्चासह मुं.प्रां.मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये उपलब्ध ठेकेदारा मार्फत अं.प.दरावर तातडीने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २१६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शहागंज भाजी मंडई येथे मनपाच्या मालकीचे मच्छी मार्केट होते. गेल्या पाच-सहा वर्षांपासुन सदरील ठिकाणी मच्छी व्यवसाय होत नाही. तेथे दुर्गंधी पसरलेली असुन काही प्रमाणात अतिक्रमण सुध्दा झालेले आहे. सद्यःस्थितीत सदरील ठिकाणाहून महानगरपालिकेस कुठल्याही प्रकारचे उत्पन्न मिळत नाही. गेल्या पाच-सहा वर्षांपासुन बंद असल्यामुळे त्याची पडझड होत असुन अत्यंत दुरावस्था झालेली आहे. त्याची देखभाल मनपास करणे शक्य नाही. दुरूस्तीसाठी बराचसा खर्च करावा लागणार आहे. या ठिकाणी दहा दुकाने व पहिल्या मजल्यावर १० अशी एकुण २० दुकाने असुन एकुण १२०० चौ.मी.क्षेत्रफळ आहे.

श्रीमिक संघ अधिनियम १९२६ अंतर्गत अतिरिक्त निबंधक, औरंगाबाद यांचे नोंदणी क्रमांक काउआ/औबाद/श्रसंअ/३/२८०७ दि.३०.७.२००४ अन्वये नोंदणी केलेले "महात्मा फुले भाजीपाला

आडत व्यापारी संघटना, औरंगाबाद" यांनी सदरील जागा भाजीपाला साठविणे (स्टोअर) करणेसाठी भाडेतत्वावर मागितलेली आहे.

करीता सदरील जागा "महात्मा फुले भाजीपाला आडत व्यापारी संघटना, औरंगाबाद" या संस्थेस मनपाच्या अटी-शर्तीनुसार भाडेतत्वावर दिल्यास खेडेगांवातुन येणारा भाजीपाला स्टोअर करता येईल व त्याची व्यवस्थीत निगा राखता येईल व मनपाच्या जागेची देखभाल होईल तसेच दुरूस्तीसाठी येणारा खर्च सदर संस्थेने स्वतः करावा या व इतर अटी-शर्तीनुसार दीर्घ मुदतीसाठी भाडेतत्वावर देण्याच्या मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

सुचक : दामोधर शिंदे　　　　　　　　　　अनुमोदक : नारायण कुचे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहागंज भाजी मंडई येथे मनपाच्या मालकीचे मच्छी मार्केट येथील ५-६ वर्षापासुन विनावापर असलेल्या मनपाच्या जागेवर अतिक्रमणामुळे जागेचा दुरूपयोग होत असल्याने श्रमिक संघ अधिनियम १९२६ अंतर्गत अतिरिक्त निबंधक, औरंगाबाद यांचेकडील नोंदणीकृत "महात्मा फुले भाजीपाला आडत व्यापारी संघटना, औरंगाबाद" यांनी मागणी केल्यानुसार दुरूस्तीसाठी येणारा खर्च सदर संस्थेने स्वतः करावा या व इतर अटी-शर्तीनुसार दीर्घ मुदतीसाठी भाडेतत्वावर देण्यास सर्वानुमते मंजुरी दण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २१७ :**

कार्यकारी अभियंता, वॉर्ड-ब आणि क यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, वॉर्ड क्र.२ मधील १२ मीटर रूंद रस्त्याचे डांबरीकरण करणे तसेच खडी रस्ता तयार करण्याच्या कामासाठीच्या रक्कम रू.१४,६३,५३९/- च्या अंदाजपत्रकास मा.स्थायी समिती विषय क्र.१५० दि. ३/११/२००९ अन्वये मान्यता मिळाली असुन सदरील कामासाठी निविदा मागविण्यात आल्या असता एकुण पाच निविदा प्राप्त झाल्या असुन त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | आर.के.कन्स्ट्रक्शन | ३२% कमी |
| २. | एम. ए. सिद्यीकी | ३१.९३% कमी |
| ३. | राजेंद्रसिंग अजितसिंग | ३०.८७% कमी |
| ४. | मे.मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन | ३०.३% कमी |
| ५. | मे.आदिनाथ कन्स्ट्रक्शन | ७.८५% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची म्हणजेच अं.प. दरापेक्षा ३२% कमी दराची आर.के. कन्स्ट्रक्शन यांची निविदा असुन निविदेस मा.आयुक्त यांची दि.१८/११/०९ नुसार मान्यता प्राप्त झाली आहे. त्यानुसार सदरील कामासाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची अं.प. दरापेक्षा ३२% कमी दराची आर.के.कन्स्ट्रक्शन यांची निविदा विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.२ मधील १२ मीटर रूंद रस्त्याचे डांबरीकरण करणे तसेच खडी रस्ता तयार करण्याच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प. दरापेक्षा ३२% कमी दराची आर. के. कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. तसेच सभागृहात झालेल्या चर्चेनुसार कामाचे गुणवत्ता पडताळणीसाठी देयकाची १५% रक्कम एक वर्षासाठी थांबविण्यात यावी असे सर्वानुमते ठरले.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २१८ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, दिनांक 16-6-2008 रोजी अतिक्रमण हटाव मोहिमे अंतर्गत निष्काशीत केलेले एकुण फ्रुट स्टॉल धारकांना पर्यायी जागा देणे बाबत प्रशासनातर्फे दि.01-07-2008 रोजी ठराव क्र.54 नुसार फक्त 07 स्टॉल धारकांना शहागंज भाजी मंडई येथे पर्यायी जागा देण्यास स्थायी

समितीने मान्यता दिलेली आहे. परंतु या मोहिमेत निष्काशीत झालेल्या इतर स्टॉल धारकांना पर्यायी जागा देण्यात आलेली नाही. वास्तविक पाहता दिनांक 01-07-2008 च्या स्थायी समिती सभेपुढे प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावात ज्या लोकांची दुकाने निष्काशीत करण्यात आली त्या सर्वांना पर्यायी जागा देणे आवश्यक होते. तथापी असे झालेले नाही त्यामुळे संबंधीत स्टॉल धारकांवर एक प्रकारे अन्याय झाल्याची भावना त्यांच्यामध्ये निर्माण झालेली असून त्यांनी व्यवसाया करीता पर्यायी जागा मिळण्याची विनंती केलेली आहे. शहागंज आरोग्य केंद्राला लागुन मनपाची मोकळी जागा उपलब्ध आहे. सध्या सर्व विक्रेते रस्त्यावर व्यवसाय करीत असल्याने रहदारीस अडथळा निर्माण होतो. म्हणुन खालील दर्शविल्याप्रमाणे शहागंज भाजी मंडईतील निष्काशीत स्टॉल धारकांना सदरच्या मोकळ्या जागेत 6x4 फुट आकाराची पर्यायी जागा महानगरपालिकेच्या प्रचलित अटी शर्तीनुसार व चालु आर्थिक वर्षातील सिध्द शिघ्र गणकाच्या दरानुसार भाडेपट्ट्यावर देण्यात यावी. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

1. शख कासीम शेख खाजा
2. रफिक खान रियाज खान
3. शेख इब्राहीम शेख हसन
4. शेख जावेद शेख रशीद
5. शेख अजिज शेख महेबुब
6. मुबारक खान हुसेन खान
7. शेख मुख्तार शेख खाजा
8. रियाज खान हुसेन खान
9. राजु हिरालाल परदेशी
10. शांताराम रामचंद्र चौधरी

सुचक : सिताराम सुरे | अनुमोदक : रविकांत गवळी

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मोहल्ला शहागंज येथील लहान व्यावसायिक/स्टॉल धारकांची दुकाने दि.16-6-2008 रोजी अतिक्रमण हटाव मोहिमे अंतर्गत निष्काशीत केल्यामुळे प्रस्तावात दर्शविलेल्या रहदारीस अडथळा निर्माण होऊ नये म्हणुन प्रस्तावात नमुद केलेल्या अ.क्र.1 ते 10 मधील स्टॉल धारकांना शहागंज आरोग्य केंद्राला लागुन असलेल्या मोकळ्या जागेत महानगरपालिकेच्या प्रचलित अटी शर्तीनुसार व चालु आर्थिक वर्षातील सिध्द शिघ्र गणकाच्या दरानुसार 6x4 फुट जागा भाडेपट्ट्यावर देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**चर्चा :**

श्री.विनायक पांडे : आज शिवसेनेच्या जिल्हाप्रमुखांनी स्वतःच्या लेटरपॅडवर होर्डीग लावण्याची परवानगी मागीतलेली असतांना महानगरपालिकेने परवानगी दिलेली नाही.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : जागा शिल्लक नसेल.

श्री.विनायक पांडे : अफजलखान वधाचा शौर्य दिन साजरा केला जात आहे ते होर्डीग लावण्याची परवानगी देण्यात येत नाही त्याला कारण देण्यात येते की, सिपी साहेबांनी फोन केला आहे, सिपीचे लेखी पत्र आलेले आहे का? यासर्व बाबीचा खुलासा करण्यात यावा.

मा.सभापती : शिवसेना जिल्हाप्रमुख साहेबांनी परवानगी मागीतली असेल तर ती देणे भाग आहे परंतु कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणुन प्रशासनाने परवानगी दिली नसेल.

श्री.विनायक पांडे : राज्याच्या गृहमंत्र्यांनी परवानगी दिलेली आहे, इतिहास आहे तो.

श्री.सतिष कटकटे : कायदा व सुव्यवस्थेचा कोणता प्रश्न निर्माण होणार आहे खुलासा करण्यात यावा.

मा.सभापती : अधिकार सर्व मा.आयुक्तांना आहे. कुठलेही कारण दाखवुन मा.आयुक्त परवानगी नाकारू शकतात. लोकांनी मागणी केल्यानुसार परवानगी देणे किंवा नाही देणे हे शेवटी आयुक्तांचा अधिकार आहे.

श्री.प्रशांत देसरडा : याबाबतीत पत्र आले आहे का?

मालमत्ता अधिकारी : शिवसेना जिल्हाप्रमुख श्री.सुहासजी दाशरथे यांनी होर्डीग लावण्यासाठी परवानगी मागण्यासाठीचा अर्ज आलेला आहे. मागणी केलेले स्थळ गुलमंडीचौक, बाबा पेट्रोल पंप चौक, क्रांती चौक, सिडको बसस्टॅड टि पॉईट, टि.व्ही सेंटर चौक हे स्थळ दर्शविलेले आहे. अर्ज प्राप्त झाल्यानंतर कारवाईस प्रारंभ केला होता परंतु मा.सिपी साहेबांचे पत्र मिळाले आहे. जे पत्र मिळाले ते वाचुन दाखविण्यात येते.

मा.सभापती : सदर पत्रांची छायांकीत प्रत प्रत्येक सदस्यांना देण्यात यावी.

मालमत्ता अधिकारी : पत्राच्या अनुषंगाने मालमत्ता विभागाकडुन अर्जदारास विचारणा केलेली आहे. आम्ही उल्लेख केला आहे की, आपण मागणी केल्यानुसार होर्डीगवर कोणत्या स्वरूपाचा मचकुर राहणार आहे याचा उल्लेख आलेला नाही.

श्री.सतिष कटकटे : सिपीकडुन कुठले गोपनिय पत्र आलेले आहे ते वाचुन दाखविण्यात यावे. परवानगी महानगरपालिका देते.

श्री.विनायक पांडे : महानगरपालिका कधीपासुन सिपीना कळवु लागली आहे.

श्री.प्रल्हाद निमगांवकर : होर्डीगमधे कुठला मजकुर लावणार म्हणुन त्यांना माहिती होते का?

मा.सभापती : विषय काय आहे ते सांगण्यात यावे.

श्री.रविकांत गवळी : शिवाजी महाराजांच्या होर्डीगला परवानगी देत नाही, महानगरपालिकेच्या मुख्य प्रवेशद्वारासमोरील होर्डीगला परवानगी आहे का?

मा.सभापती : प्रशासनाने खुलासा करण्यात यावा.

मालमत्ता अधिकारी : फिसची भरणा केलेली आहे परवानगी घेतलेली आहे.

श्री.रविकांत गवळी : एकाला परवानगी देण्यात येते व दुसऱ्याला परवानगी देत नाही.

मा.सभापती : माझ्या होर्डीगने कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही.

श्री.प्रशांत देसरडा : होर्डीगवर कुठल्या नगरसेवकांचे फोटो छापलेले आहे खुलासा करण्यात यावा. (सभागृहात स.सदस्य मोठमोठयाने बोलत होते काहीही ऐकु येत नव्हते)

मा.सभापती : गोपनिय पत्र असल्याकारणाने सभागृहात वाचता येत नाही. कोणत्याही होर्डीगला परवानगी देण्याचा नाकारण्याचा अधिकार मा.आयुक्तांचा आहे. परवानगी नाकारली आहे. मा.आयुक्तांनी प्रशासनाने जे केलेले आहे ते बरोबर केलेले आहे.

श्री.विनायक पांडे : सदर पत्रात काय लिहिले आहे याचा खुलासा करण्यात यावा.

मा.सभापती : मा.पोलीस आयुक्तांचे पत्र आहे ते गोपनिय पत्र आहे. सभागृहात वाचुन दाखवू शकत नाही. त्याबाबतीत मा.आयुक्त साहेब खुलासा करीत आहे. कोणत्याही होर्डीगला परवानगी देण्याचा नाकारण्याचा अधिकार मा.आयुक्तांचा आहे.

राष्ट्रगीतानंतर सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद